रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ५८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, १३ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवशी मुंबईतील १० हजार बूथवर दीपोत्सव

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी मुंबईतील १० हजार बूथवर दिवे प्रज्वलित करून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात येणार आहे. मुंबईतील १० प्रमुख ठिकाणांची रोषणाई आणि मोठ्या प्रमाणावर मधुमेह व रक्तदाब तपासणी मोहीम राबवण्यात येणार असून याच दिवशी मधुमेहमुक्त मुंबई उपक्रमाचा शुभारंभ होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी घटनात्मक पदावर २५ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेवा संकल्प अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी दिली. यंदा सेवा पंधरवड्याऐवजी महिनाभर हे अभियान राबवले जाणार आहे. १७ सप्टेंबर रोजी अभियानाची सुरुवात 'सेवा दिवस' म्हणून करण्यात येणार आहे.

अंतरंग
'सुरक्षित मातृत्व आरोग्यासह सामाजिक जबाबदारी' / २
सिडकोच्या ११ प्रकल्पग्रस्तांसह १३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती / ६
विराटचे पुन्हा विजय हजारे ट्रॉफीत खेळण्याचे संकेत / ८

# एमपीएससीवरून राजकीय पोळी भाजू देणार नाही -मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

एमपीएससी परीक्षेतील गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर सरकारने सविस्तर बैठक घेऊन सर्व बाबींवर सकारात्मक चर्चा केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकार अत्यंत गंभीर असून परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांना जेरबंद करण्यात आले आहे. भविष्यातही अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथे माध्यमांशी बोलताना दिला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, काही जण विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे समाधान करण्याऐवजी या मुद्द्याचे राजकारण करून त्यातून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र कोणालाही विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर राजकीय फायदा घेता येणार नाही. राज्य सरकार पूर्ण ताकदीने विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे आहे. परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सरकारकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. भविष्यात अधिक काटेकोर आणि पारदर्शक परीक्षा पद्धती लागू केली जाईल. दोषींवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांना न्याय दिला जाईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

**पेपरफुटी रोखण्यासाठी राज्यात नवे सूत्र**

प्रश्नपत्रिकाच नसल्या तर पेपरफुटीचा धोकाही राहणार नाही. त्यामुळे आयत्या वेळी प्रश्नपत्रिका निर्माण करण्याचे सूत्र निश्चित करण्यात आल्याचे राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठीत उच्चस्तरीय कृती समितीच्या (टास्क फोर्स) अध्यक्ष व सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले. प्रश्नपत्रिकांची निर्मिती, छापाई, वितरण आदी टप्प्यांवर गळतीचे धोके असतात. त्यामुळे ही साखळी संपुष्टात आणून कोणालाही प्रश्नापत्रिकांची माहिती होऊ शकणार नाही अशी व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**सण-उत्सवांत विघ्न आणू नका**

दरम्यान, मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांना मानणाऱ्या प्रत्येकाने हिंदूंच्या सणांचा आणि गणेशोत्सवाचा आदर करावा. हिंदूंच्या सणांमध्ये किंवा गणेशोत्सवात कोणत्याही प्रकारचे विघ्न आणले जाऊ नये. सण उत्सव हे एकतेचे प्रतीक असून त्यात अडथळा आणणे योग्य नाही, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

# गणेशभक्तांसाठी रायगड प्रशासन सज्ज

## महामार्गावर १० सुविधा केंद्रे, नो पार्किंग झोन





**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणातील आपल्या मूळगावी जाण्यासाठी शुक्रवारपासूनच गणेशभक्त निघाले आहेत. शनिवारी मुंबई-गोवा महामार्गावर काही भागात वाहतूक कोंडी झाली होती. वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर तसेच इतर मार्गावर वाहतूक कोडी होऊ नये यासाठी ठिकठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्यात आली आहे.

पर्यायी मार्ग सुचविण्यात आले आहेत. जेथे वाहतूक कोंडी होते तेथे नो पार्किंग झोन करण्यात आले आहेत. प्रवाशांच्या मदतीसाठी १० मदत केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. कही ठिकाणी कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वरील माणगाव येथील रेड्डीज हॉटेल ते ढालघर फाटा, निजामपूर नाका ते कालवा रोड, मोर्बा नाका ते पवारवाडा हॉटेल, इंदापूर येथील माही हॉटेल ते कशेने बायपास या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा नो पार्किग झोन घोषित करण्यात आले आहेत. गणेशोत्सवानिमित्याने कोकणात दाखल होणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाने प्रशासकीय तयारी पूर्ण केली आहे.

*गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास विनाअडथळा व्हावा म्हणून रायगड पोलीस सज्ज झाले आहेत. अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. जेथे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे तेथे रस्त्यावर नो पार्किंग झोन घोषित करण्यात आले आहेत. गणेशभक्तांनीदेखील आपला प्रवास विनाअडथळा व्हावा यासाठी शिस्त पाळावी. पोलिसांनी केलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे.*

*-आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड*


सहा उपविभागीय अधिकारी, ११ पोलीस निरीक्षक, ६३ सहाय्यक पोलीस निरीक्षक व ३६३ पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. याशिवाय ५०० होमगार्ड, राज्य राखीव दल कंपनी, शीघ्र कृती दल, महामार्ग पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. पोलिसांना एकमेकांसोबत तसेच नियंत्रण कक्षासोबत संपर्क साधण्यासाठी ३७ बिनतारी संच व वॉकीटॉकी देण्यात आले आहेत.

# कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी शिवसेनेची मोफत बससेवा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या भाविक व नागरिकांच्या सोयीसाठी शिवसेनेच्या वतीने मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या बससेवेचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १२) करण्यात आला. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील उपस्थित होते.



महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक केले. तसेच शिवसेनेचे महानगर संघटक राहुल गोगटे यांच्या वतीने आणखी एका मोफत वाहनसेवेचाही शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक रमेश गुडेकर, नगरसेवक ॲड. प्रथमेश सोमण, महिला आघाडी तालुकाप्रमुख मंदाताई जंगले, उपमहानगरप्रमुख महेश सावंत, सचिन मोरे, युवासेना लोकसभा अध्यक्ष पराग मोहिते, महानगर संघटक मंगेश रानवडे, एकनाथ म्हात्रे, पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांनी शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण व पत्रकार संजय कदम यांचा १४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन सत्कार करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सव काळात कोकणवासीयांना दिलासा देणारा हा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## 'नमो एक्स्प्रेस'ने दीड हजार चाकरमानी कोकणात रवाना

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त मुंबईतील चाकरमान्यांना गावच्या बाप्पाच्या दर्शनासाठी कोकणात जाता यावे यासाठी लोढा फाउंडेशनच्या वतीने यंदाही विशेष नमो एक्स्प्रेसची व्यवस्था करण्यात आली आहे. शनिवारी सकाळी ११ वाजून ५ मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील फलाट क्रमांक १८वरून ही ट्रेन कोकणाकडे रवाना झाली. मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांच्या हस्ते या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. ट्रेनमधून १५००हून अधिक गणेशभक्तांनी सावंतवाडीपर्यंत प्रवास केला. सीएसएमटी स्थानकावर चाकरमान्यांनी मोठी गर्दी केली होती आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला.

## निवडक

### जळगावात स्थापनेआधीच बाप्पाचे विसर्जन! १२ फुटी गणेशमूर्ती दुभंगली

**जळगाव** : गणेशोत्सवासाठी जळगावकडे आणलेली १२ फूट गणेशमूर्ती वाटेतच दुभंगल्याने नवी पेठेतील जय महाराष्ट्र मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांना धक्का बसला. ४७ हजार रुपये खर्चून तयार करून घेतलेल्या भव्य मूर्तीची गणेशोत्सवात स्थापना करण्याऐवजी विसर्जनाची वेळ मंडळावर आली. मूर्ती आणताना झाकून ठेवण्यात आली होती. प्रवासादरम्यान तडे गेले किंवा दुभंगली याची माहिती कार्यकर्त्यांना तत्काळ मिळाली नाही.

### ज्येष्ठ विचारवंत डॉ. रत्नाकर महाजन यांचे निधन

**पुणे :** ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, राज्य नियोजन मंडळाचे माजी कार्यकारी अध्यक्ष, काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. रत्नाकर महाजन (८०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी रात्री पुण्यात निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी, पुरोगामी, वैचारिक चळवळीतील महत्त्वाचा आवाज काळाच्या पडद्याआड गेला. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई असा परिवार आहे. महाजन यांच्यावर शनिवारी वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# स्व. रघुनाथशेठ जितेकर यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून कार्य करा -लोकनेते रामशेठ ठाकूर

## ■ दापोलीत पुण्यस्मरणानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. रघुनाथशेठ जितेकर यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण सर्वांनी जोमाने कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दापोली येथे बक्षीस वितरण समारंभात केले. रयत शिक्षण संस्थेच्या अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनियर कॉलेजचे माजी चेअरमन स्वर्गीय रघुनाथशेठ जितेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त दापोली येथे बक्षीस वितरण समारंभ शनिवारी (दि. १२) आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर उपस्थित होते. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी स्व. रघुनाथशेठ जितेकर यांच्या स्मृतींना उजाळा दिला. त्यांनी शाळेची प्रगती, पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक विकासासाठी दिलेले योगदान अमूल्य असल्याचे सांगत मान्यवरांनी त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला व त्यांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, प्राचार्य गणेश ठाकूर, समाधान घोपरकर, शरद खारकर, विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, चेअरमन प्रकाश जितेकर, जिल्हा परिषद सदस्या सोनाली जितेकर, पंचायत समिती सदस्या मनीषा पाटील, अमित भोईर, सुनील भोईर, दीपक डाउर, प्राचार्या पुष्पलता ठाकूर यांच्यासह विविध क्षेत्रांतील प्रमुख मान्यवर, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवशाही बसच्या डिक्कीचा फटका बसून वृद्धाचा मृत्यू

**पालघर** : पालघर-मनोर मार्गावरील चहाडे-सज्जनपाडा परिसरात शिवशाही बसच्या डिक्कीचे झाकण अचानक उघडून त्याचा फटका बसल्याने सुभाष महाद्या पागी (६०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सुभाष पागी हे चहाडे-सज्जनपाडा येथे राहत होते. देवखोप येथे नातेवाइकांकडे गेलेले पागी तेथून पायी घरी परतत होते. सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास पालघर आगारातून स्वारगेटकडे जाणारी शिवशाही बस मनोरच्या दिशेने जात असताना बसच्या डिक्कीचे झाकण अचानक उघडले. त्याचा जोरदार फटका रस्त्याने चाललेल्या पागी यांना बसला. गंभीर जखमी अवस्थेत ते रस्त्यावर कोसळले. घटनेनंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे एसटी महामंडळाच्या वाहनांच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

|| श्री गणेशाय नमः ||

राम प्रहर




तुमचा लाडका बाप्पा झळकणार 'दै. रामप्रहर'मध्ये!

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!
आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहूद्या...
१५ ते २४ सप्टेंबर या कालावधीत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो 'रामप्रहर'मध्ये विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहेत.

बाप्पाचा फोटो इथे पाठवा
ई-मेल आयडी : ramprahar@gmail.com
व्हॉट्सॲप क्रमांक : ७७३८१०६००९

फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा
- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...
दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!

# भाजप कामगार आघाडी पनवेल उत्तर मंडळ अध्यक्षपदी हरेश पाटील, उरण शहर अध्यक्षपदी दशरथ चव्हाण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी कामगार आघाडीच्या वतीने कामगारांचे हक्क आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध मंडळांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. याअंतर्गत प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर व भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप कामगार आघाडीच्या पनवेल उत्तर मंडळाच्या अध्यक्षपदी हरेश पाटील यांची, तर उरण शहर मंडळ अध्यक्षपदी दशरथ चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तिपत्र देण्याचा कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तिपत्र**

(दि. १२) पार पडला. यावेळी कामगार आघाडीचे जिल्हा अध्यक्ष रवी नाईक, उपाध्यक्ष ॲड. माधवराव खेरडे, उद्योग आघाडी पनवेलचे अध्यक्ष महेश पाटील, कामगार आघाडीचे सचिव रवींद्र कोरडे, बाळाराम पाटील, अनंता भोईर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणे, त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे आणि त्यांना योग्य तो न्याय मिळवून देणे यासाठी आपण कटिबद्ध राहू, असा विश्वास यावेळी नवनियुक्त अध्यक्षांनी व्यक्त केला.

# आम्ही कोणाच्याही विरोधात नाही; ब्रिक्स परिषदेतून मोदींचा संदेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



यंदाची १८वी ब्रिक्स शिखर परिषद दिल्लीत १२ आणि १३ सप्टेंबर रोजी पार पडत आहे. रशियाचे अध्यक्ष पुतीन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, इराणचे अध्यक्ष पेझेश्कियन यांच्यासह अनेक देशांचे प्रमुख या परिषदेत सहभागी झाले आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते परिषदेची औपचारिक सुरुवात झाली.

यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणांना आता विलंब करता येणार नाही. आम्ही कोणाच्याही विरोधात नाही, असे सांगत त्यांनी पाश्चात्य देशांना संदेश दिला. भारताचे ब्रिक्स अध्यक्षपद जनकेंद्रित आणि मानवतेला प्राधान्य देणाऱ्या दृष्टिकोनावर आधारित असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# सुरक्षित मातृत्व आरोग्यासह सामाजिक जबाबदारी -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पुणे : प्रतिनिधी**

सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मातृत्वाचा प्रवास प्रत्येक महिलेने भीतीतून नव्हे, तर विश्वासातून करावा. वैद्यकीय उपचारांसोबत माया, आधार, सुरक्षितता आणि सन्मानाची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.



सिम्बायोसिस विद्यापीठ रुग्णालय व संशोधन केंद्राच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'माहेरवाशीण मातृत्व सेवेची नवी संकल्पना' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आज सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ कॅम्पस, लवळे, मुळशी येथे त्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार शंकर मांडेकर, सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. आर. रमण, प्रोव्होस्ट तथा वैद्यकीय व आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रमुख डॉ. राजीव येरवडेकर, सिंबायोसिसचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. (डॉ.) शां. ब. मुजुमदार आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, आपल्या संस्कृतीत 'माहेर' म्हणजे माया, आधार, सुरक्षितता, काळजी आणि 'तू एकटी नाहीस' हा विश्वास. गर्भावस्थेपासून प्रसूतीनंतरच्या काळापर्यंत महिलेला वैद्यकीय उपचारांसोबत भावनिक सुरक्षितता, पोषण, विश्रांती, कुटुंबाचा आधार, सन्मान आणि आपलेपणाची गरज असते. या सर्व बाबींना एकत्र आणणारी 'माहेरवाशीण' ही संकल्पना असून, प्रत्येक मातेसाठी रुग्णालय हेच मातृगृह ठरावे, हा त्यामागील विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

निरोगी माता म्हणजे निरोगी कुटुंब आणि निरोगी कुटुंब म्हणजे सक्षम महाराष्ट्र. महिला आणि बालकांचे आरोग्य हा केवळ वैद्यकीय विषय नसून कुटुंब, समाज आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाशी निगडित विषय आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील महिलांपर्यंत मातृत्वविषयक आरोग्यसेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आशा कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असे त्यांनी नमूद केले.

आशा कार्यकर्त्यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना 'माहेर-दूत' म्हणून सक्षम करण्याची संकल्पना या उपक्रमात आहे. यामुळे गर्भवती महिलांना आवश्यक माहिती, मार्गदर्शन आणि वेळेवर आरोग्यसेवेशी जोडण्यास मदत होईल. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या 'कुटुंब दत्तक योजना'सारख्या समुदायाभिमुख उपक्रमांशी 'माहेरवाशीण'ची सांगड घातल्यास भावी डॉक्टरांना महिलेकडे केवळ वैद्यकीय प्रकरण म्हणून नव्हे, तर एक व्यक्ती, कुटुंब आणि सामाजिक वास्तव म्हणून पाहण्याची दृष्टी मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'माहेरवाशीण' उपक्रमाची संकल्पना डॉ. राजीव येरवडेकर यांनी मांडली आहे. प्रत्येक रुग्णालय हे गर्भवती महिलेसाठी तिच्या माहेरासारखे प्रेम, आधार आणि सुरक्षितता देणारे ठिकाण असावे, ही संकल्पना यामागे आहे. प्रसूतीसाठी रुग्णालयात येणाऱ्या महिलेकडे केवळ 'रुग्ण' म्हणून न पाहता माहेरी आलेली मुलगी म्हणून सन्मानाने आणि आपुलकीने पाहण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

'माहेर अनुभव, माहेर पोषण, माहेर संस्कृती आणि माहेर बाळंतपणोत्तर काळजी' या चार प्रमुख आधारस्तंभांवर हा उपक्रम आधारित आहे. प्रसूतीपूर्व व प्रसूतीदरम्यान आश्वासक वातावरण, संवेदनशील परिचर्या, पसंतीच्या व्यक्तीची साथ, पौष्टिक आहार, सांस्कृतिक परंपरांचा सन्मान, स्तनपान व नवजात बालकाची काळजी तसेच प्रसूतीनंतरच्या मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन अशा माध्यमातून मातेची सर्वांगीण काळजी घेण्यात येणार आहे.

यावेळी मातृत्व व बाल आरोग्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या आरोग्यसेवकांचा तसेच 'माहेरवाशीण' उपक्रमाच्या लाभार्थी मातांचा सत्कार करण्यात आला.

# मेटकर्णी परिसरात रस्त्यांची दुरवस्था

## काँक्रीटमधील सळया आल्या रस्त्यावर

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मेटकर्णी हा परिसर श्रीवर्धन बस स्थानकाला लागूनच आहे. म्हसळे श्रीवर्धन मुख्य रस्त्यालगत मेटकर्णी गावातील काही घरे असून सर्वात दाट वस्ती डोंगरावरती आहे. डोंगरावरती जाण्यासाठी काँक्रीटचे रस्ते तयार केलेले होते. परंतु या रस्त्यांची प्रचंड प्रमाणात दुरावस्था झाली आहे. अनेक ठिकाणच्या मोऱ्या खचून गेल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे. तर रस्ते फुटून लोखंडी सळ्या रस्त्यावरती आलेल्या पाहायला मिळत आहेत. यामध्ये अनेक लहान मुले, वृद्ध व्यक्ती पडल्याचे देखील सांगितले जात आहे.



त्यातच या ठिकाणी पाणी पुरवठा योजना करणाऱ्या ठेकेदाराने पाण्याचे पाईप देखील रस्त्याच्या बाजूने उघड्यावर टाकल्याने रस्त्यातून चालताना अडचण निर्माण होते. मेटकर्णी परिसरातील संपूर्ण वस्ती ही डोंगरावरती आहे. पण पावसाळ्यात अनेक ठिकाणी डोंगराची धस खाली आल्याचे देखील पाहायला मिळते. आराठी ग्रामपंचायत हद्दीतील बाकीच्या परिसरामध्ये काँक्रीटचे रस्ते व पायऱ्या नव्याने बनवण्यात आल्या आहेत.

परंतु मेटकर्णीच्या या डोंगराळ भागातील वस्तीमध्ये ग्रामपंचायती कडून कामे करताना भेदभाव होत असल्याचा आरोप या परिसरात राहणाऱ्या नागरिकांकडून केला जात आहे. सध्या या रस्त्यावरती पडलेले खड्डे व खचलेल्या मोरया यावरील खड्डे बुजवण्याचे काम ग्रामपंचायतीकडून हाती घेण्यात आले आहे. पडलेल्या खड्ड्यांमध्ये व खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी काँक्रीट ओतून रिपेअर करण्याचे काम सुरू आहे. दोनच दिवसात गणरायाचे आगमन होणार असून गणेशमूर्ती डोक्यावरुन आणण्यासाठी रस्ता तरी चांगला असावा अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

या परिसरामध्ये ग्रामपंचायतीकडून साफसफाई देखील करण्यात येत नसल्यामुळे सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पसरलेले पाहायला मिळते. असेही संपूर्ण आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये कचऱ्याचे साम्राज्य असल्याचे पाहायला मिळते. तसेच एका इमारतीतील सांडपाणी देखील मुख्य रस्त्यावरती वाहताना पाहायला मिळते. याबाबत आराठी ग्रामपंचायतीने तातडीची कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# कर्जत शहरातील वाहतूक कोंडी सोडवणार -उपअधीक्षक गायकवाड



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहर बचाव समिती कडून शहरातील वाहतूक कोंडीवर आग्रही भूमिका घेण्यात आली आहे. शहराची समस्या बनलेली वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पोलीस उप अधीक्षक सकारात्मक आहेत. बैठकीत कर्जत पोलीस कठोर होतील पण वाहतूक कोंडीतून गणेश भक्तांची सुरक्षा अबाधित राखण्याचे प्रयत्न केले जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

कर्जत शहर बचाव समितीची ट्राफिक समस्ये बाबतची महत्त्वाची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या दालनात घेण्यात आली. या बैठकीला कर्जत शहर बचाव समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे तसेच भाऊ खानविलकर, कृष्णा जाधव, विकास चित्ते, धर्मेंद्र मोरे, भीमराव गाडे, स्वीटी बार्शी, विजय बेडेकर, सतीश मुसळे, केशव मोरे, अतुल पवार, प्रशांत उगलेआदी उपस्थित होते.

यावेळी समितीचेवतीने चार फाटा येथील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी. रेल्वे ब्रिज ते नमस्ते हॉटेल दरम्यान रोडच्या मध्ये गणपती नंतर डिव्हायडर टाकले जावेत. चार फाटा येथील सिग्नल लवकरच सुरू करावेत.

# रोह्यात ३१ मेपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाचे लोकार्पण होणार -खासदार सुनील तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास स्वाभीमानात भर टाकणारा आहे.त्यांचा योगदान प्रचंड प्रमाणाचा आहे. रोह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुष्करणी करु शकल्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चरणी सेवा करण्याची संधी मला मिळाली. कुंडलिका नदी संवर्धन, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व सभोवताल शिवसुष्टी आज रोहयाचे वैभव आहे.नमो उद्यान कुंडलिका नदी संवर्धन परीसरात परीसरात झाले आहे. शिरोटोपातील तुरा आहे. हिरकणी कक्षाचा अधिका अधिक लाभ घेता येईल. ३१ मे २०२७ पर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाचे लोकार्पण झाले पाहिजे अशा सुचना खा.सुनील तटकरे यांनी नगरपरिषदेस दिल्या.



रोहा अष्टमी नगरपरिषद करिता वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नमो उद्यान लोकार्पण, रोहा बस स्थानक येथे महिला व बालविकास विभागाअंतर्गत हिरकणी कक्षाचा लोकार्पण, अष्टमी नगरपरिषद हद्दीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळ्याचे भूमिपूजन प्रसंगी जेष्ठ नागरिक सभागृह येथे आयोजित सभेत खा.सुनील तटकरे बोलत होते.

या कार्यक्रमास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, राष्ट्रवादी प्रवक्ते मनोजकुमार शिंदे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष महेंद्र पोटफोडे, कार्याध्यक्ष समिर शेडगे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, रवींद्र चाळके, गौरी बारटक्के, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक अजित मोरे, संजना शिंदे, सुप्रिया जाधव, प्रशांत कडु सुभाष राजे, यज्ञेश भांड यासह नगरसेवक, रोहा अष्टमीतील प्रतिष्ठित नागरिक, उपस्थित होते.

यावेळी ना.आदीती तटकरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा असावा अशी सगळ्यांची इच्छा होती. संपुर्ण देशात नसेल तसा पुतळा रोह्यात होईल.उत्तम प्रशासक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होत्या. त्यांची प्रेरणा रोहेकरांना मिळणार आहे

.रायगड जिल्हयात दोन नमो उद्यान आहेत. तेही दोन्ही माझ्या मतदारसंघात आहे. दोन हिरकणी कक्ष उभे करण्यात आले आहे.

प्रास्ताविकात वनश्री शेडगे यांनी रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीत खा.सुनिल तटकरे, ना.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून विकासाचा नवा वेग, नवा पर्व सुरू झाला आहे. नागरीकांची अनेक वर्षाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची मागणी होती. अखेर ना.आदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांच्यामुळे आज ती पुर्ण होत आहे.या पुतळयामुळे रोहेकरांना प्रेरणा मिळणार आहे.यासह नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांची माहिती यावेळी शेडगे यांनी दिली.या कार्यक्रमात सुत्रसंचलन हर्षद साळवी यांनी तर आभार महेंद्र दिवेकर यांनी मानले.

# महावितरणला 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी' पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

ऊर्जा परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी, सौर ऊर्जेद्वारे शेतीला दिवसा वीज तसेच ग्रामीण अर्थकारणाला बळ, गुंतवणूक व रोजगार संधी, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक शिस्त आदींच्या माध्यमातून महावितरणने देशाच्या वीज क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या नेतृत्वासाठी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'ने तसेच वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम




बुद्धिमत्तेच्या प्रभावी तंत्रज्ञानासाठी महावितरणचा 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने गुरुवारी (दि. १०) गौरव करण्यात आला.

भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि भविष्यातील दिशा यावर मंथन करण्यासाठी '६ व्या ईटी एनर्जी लीडरशिप समिट २०२६' चे नवी दिल्ली येथे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसीय परिषदेत ऊर्जा क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र व विविध राज्य सरकारचे तसेच वीज क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे प्रमुख, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान पुरवठादार आदींची उपस्थिती होती. यावेळी श्री. लोकेश चंद्र यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील सौर ऊर्जेच्या माध्यमातून बदलणारे ग्रामीण अर्थकारण, गुंतवणूक, रोजगार, शेतीसाठी दिवसा वीज आणि इतर सकारात्मक बदलांची माहिती दिली.

या परिषदेत सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर महावितरणचा पुरस्कार लोकेश चंद्र यांच्यासह कार्यकारी संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता संतोष सांगळे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) भूषण कुलकर्णी यांनी स्वीकारला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी यांचे व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध उपक्रमांचे नवी मुंबईत नियोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून त्यांच्या कार्यकाळातील 'सेवा परमो धर्म' या उक्तीप्रमाणे सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याचा अविरत प्रयत्न केल्यानिमित्त त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचे जाहीर करण्यात आलेले आहे. यामध्ये सेवा योगदान अंतर्गत लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्याचे सूचित करण्यात आलेले आहे.




त्या अनुषंगाने सेवा संकल्प अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्याच्या विविध कार्यक्रम, उपक्रमांविषयी नियोजन करण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विशेष बैठक घेत हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी आपले संपूर्ण सक्रिय योगदान द्यावे असे निर्देश दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संजय शिंदे यांनी अभियानाची रूपरेषा विशद केली व त्या अनुषंगाने आपल्या महानगरपालिकेमार्फत राबवावयाच्या अपेक्षित उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.दिग्विजय चव्हाण तसेच इतर विभागप्रमुख हे प्रत्यक्ष तसेच विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता, शाळांचे मुख्याध्यापक ऑनलाईन उपस्थित होते.

अभियानांतर्गत शासनामार्फत सूचित विविध उपक्रम राबवावयाचे असून यामध्ये सेवा सेतू अभियान, नाविन्यपूर्ण संकल्पनांची आव्हाने, सेवा माझे योगदान, विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योत यात्रा, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडी उत्सव, आशीर्वादाचा दिवा, बदलाची गोष्ट, आभार व संकल्प रांगोळी, नमो सेवागाथा, जनसेवक महाकुंभ अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.

या उपक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत राबवावयाच्या कार्यक्रमांबाबत आयुक्त महोदयांनी संबंधित विभागांना निर्देश दिले. यामध्ये 'सेवा सेतू अभियान' अंतर्गत नमुंमपा क्षेत्रातील आदिवासी पाड्यातील पिण्याचे पाणी, दिवाबत्ती, स्वच्छता, रस्ते, गटारे, आरोग्य इत्यादी नागरी सुविधांचे सर्वसमावेशक सर्वेक्षण करून त्यामध्ये सुधारणा हाती घ्याव्यात असे निर्देशित केले. याकरिता संबंधित विभागांनी कार्यवाही करावी तसेच त्यांना शासकीय व महानगरपालिकेच्या योजनांचा लाभ मिळतो काय? याचीही तपासणी करण्याचे सूचित करण्यात आले. प्रत्येक आदिवासी पाड्याकरिता पालक अधिकारी नेमावा असेही आयुक्तांनी निर्देश दिले.

सेतू अभियान अंतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणा-या जन्म मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ताकर विषयक विविध प्रमाणपत्रे अशा लोकसेवा शून्य प्रलंबितता ठेवून उपलब्ध करून देण्यासाठी या कालावधीत विशेष शिबिरे राबवावीत असे निर्देश आयुक्तांनी दिले.

विकसित भारत संकल्प यात्रेच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांचा जीवनमानावर होणा-या परिणामांविषयी जागरूकता आणावी, सेवा ज्योत यात्रेच्या माध्यमातून जनजागृती करावी.

# एस. एस. पाटील स्कूलमध्ये फायर अवेअरनेस कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

द्रोणागिरी येथील एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजनांबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने फायर अवेअरनेस प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आग लागण्याची कारणे, संभाव्य धोके तसेच आग लागल्यानंतर घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अग्निशमन विभागाचे उप अग्निशमन अधिकारी अमित कांबळी आणि लिडिंग फायरमन सागर साळुंके यांनी विद्यार्थ्यांना आग कशी व कुठे लागू शकते, आगीची प्रमुख कारणे कोणती, आग लागल्यास घाबरून न जाता कोणत्या उपाययोजना कराव्यात, तसेच आग विझविण्याच्या विविध पद्धती याबाबत माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवत आग प्रतिबंधक उपायांची माहिती देण्यात आली. आगीची दुर्घटना घडल्यास स्वतःचा बचाव करताना इतरांच्या सुरक्षिततेचीही काळजी कशी घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या सल्लागार स्वाती म्हात्रे, मुख्याध्यापिका मृदुला धोंडी, सहसचिव किरण घरत, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील, महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सूर्यकांत ठाकूर, जेएनपीटीचे कर्मचारी संदीप पाटील तसेच शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारीवर्ग आणि पालक उपस्थित होते.

# गणेशभक्तांसाठी कळंबोली वाहतूक शाखेचा विशेष बंदोबस्त

## वैद्यकीय सेवा, क्रेन, पोलीस अधिकारी-कर्मचारीवर्ग तैनात

**कळंबोली : बातमीदार**

गणेशोत्सवात मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरातून मोठ्या संख्येने गणेशभक्त कोकणाकडे कळंबोली सर्कल मधून मार्गस्थ होत असतात. गणेश भक्त व वाहनांची मोठ्या प्रमाणावर असलेली संख्या लक्षात घेता नेहमीच होणारी वाहतूक कोंडी व त्यातून होणारा नागरिकांना त्रास याकरिता वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, वाहतूक विभाग यांच्या वतीने विशेष वाहतूक बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. कळंबोली सर्कल येथे या उत्सवाच्या दरम्यान नेहमीच वाहतूक कोंडीशी सामना गणेश भक्तांना करावा लागतो गणेश भक्तांचा आपल्या गावाकडे जातानाचा प्रवास सुखमय सुरक्षित व आनंद मिळवावा यासाठी कळंबोली वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक



महेश कुमार सरतापे यांनी विविध उपयोजना करण्यात आल्याचे सांगितले आहे.

पोलीस उपायुक्त डॉ. राहुल खाडे, सह पोलीस आयुक्त योगेश गावडे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेशकुमार सरतापे, कळंबोली वाहतूक शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली वाहतूक विभागाच्या हद्दीत विशेष वाहतूक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या विशेष बंदोबस्तामध्ये कळंबोली वाहतूक विभागातील ०३ अधिकारी व ३५ अंमलदार, तसेच बाहेरील बंदोबस्तासाठी पोलीस मुख्यालय, नवी मुंबई येथील १० महिला अंमलदार व १० पुरुष अंमलदार, बेलापूर स्ट्राइकिंग फोर्सचे ०८ अंमलदार, ३५ ट्रॅफिक वॉर्डन (सक्षम कंपनी) तसेच ०४ एमएसएफ जवान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत कळंबोली परिसरातील प्रमुख मार्गांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाढणारी वर्दळ लक्षात घेऊन वाहतूक कोंडी टाळणे, वाहतूक सुरळीत ठेवणे तसेच कोकणाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांना सुरक्षित व सुरळीत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचे चौक, जंक्शन व वाहतूक संवेदनशील ठिकाणी विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

वाहतूक व्यवस्थेवर सतत लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार वाहतुकीचे नियमन करण्यात येणार असून, वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांकडून विशेष दक्षता घेण्यात येत आहे.गणेशभक्त व वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवावे तसेच प्रवासादरम्यान संयम बाळगावा, असे आवाहन कळंबोली वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सव काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये, वाहतूक कोंडी टाळता यावी आणि कोकणाकडे जाणारी वाहतूक सुरक्षित व सुरळीत राहावी, यासाठी१रुग्णवाहिका,कार मेकॅनिक, बॅटरी मेकॅनिक,हायड्रा क्रेन, साधी क्रेन, उपलब्ध करून दिली असून सर्कल मध्ये २४ तास पोलीस मार्गदर्शनअनऊन्समेंट उपलब्ध करून दिलेली आहे

# सायबर कायदा व सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स ,खारघर येथील संगणकशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर २०२६ सकाळी अकरा वाजता पेठपाडा जिल्हा परिषद शाळा, पेठपाडा, खारघर येथे सायबर कायदा व सायबर सुरक्षा या विषयावर विस्तार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सदर उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, वैयक्तिक माहितीची सुरक्षितता, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी आणि सायबर कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता, विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित, जबाबदार आणि योग्य पद्धतीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत पेठपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व सायबर कायदा यासंदर्भातील महत्त्वपूर्ण माहिती सोप्या व समजण्यास सुलभ पद्धतीने दिली. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी, मजबूत पासवर्डचा वापर, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, वैयक्तिक माहिती कोणासोबतही सहजपणे शेअर न करणे तसेच सोशल मीडिया वापरताना गोपनीयता राखणे यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले.या उपक्रमाचा एकूण ६७ विद्यार्थ्यांना लाभ झाला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सायबर सुरक्षा विषयाशी संबंधित विविध माहिती जाणून घेतली. या उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये



डिजिटल जगातील संभाव्य धोके ओळखण्याची तसेच सुरक्षित ऑनलाइन वर्तनाची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.सदर उपक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही ज्ञानाचे प्रत्यक्ष समाजाभिमुख उपयोजन, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी विकसित करण्याची संधी मिळाली. शैक्षणिक ज्ञान समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच संगणकशास्त्र विभागातील शिक्षकवर्ग, कर्मचारी आणि सहभागी विद्यार्थ्यांचेही या उपक्रमासाठी मोलाचे योगदान लाभले. पेठपाडा जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकवर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दल विभागाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# ४२ लाख ६४ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेमिंग कंपनीमध्ये गुंतवणूक करून चांगला नफा मिळवण्याचे आश्वासन दिले आणि ४२ लाख ६४ हजारांची फसवणूक केली. या प्रकरणी नवीन डिसूजा, किरण शिंदे, रोहित हाटे, शिवकुमार, विजय शेट्टी, गेमिंग साईटचे निर्माण आणि वापरकर्ते, बँक खातेधारक यांच्या विरोधात सायबर पोलीस ठाण्यात ९ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

फॅनरेप डॉट प्रो ही गेमिंग कंपनी रजिस्टर कंपनी असून त्यात गुंतवणूक करून चांगला नफा मिळवण्याचे आश्वासन नवीन डिसूजा यांनी फिर्यादी प्रकाश कमलाकर केणी (राहणार करंजाडे, सेक्टर २ ए) यांना दिले. यावेळी त्यांनी त्या साइटवर रजिस्ट्रेशन केले. डिसुझा याने आणि त्यांच्या साथीदारांनी विविध युपीआय आयडी पाठवून त्यावर ४२ लाख ६४ हजार रुपये रक्कम स्वीकारली. त्यानंतर केणी यांना कोणताही नफा आणि गुंतवलेली रक्कम परत केली नाही. फसवणूक झाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ‘सॉफ्ट स्किल्स’ विषयावर मार्गदर्शनपर सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी ‘सॉफ्ट स्किल्स’ या विषयावर विशेष मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा विकास करण्याच्या उद्देशाने या सत्राचे आयोजन करण्यात आले.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक पात्रता पुरेशी नसून प्रभावी संवादकौशल्य, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन, समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयक्षमता, संघभावना, सकारात्मक दृष्टिकोन आणि व्यावसायिक शिष्टाचार यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना या कौशल्यांचे महत्त्व समजावे आणि भविष्यातील शैक्षणिक तसेच व्यावसायिक आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाता यावे, हा या सत्रामागील प्रमुख उद्देश होता.या मार्गदर्शनपर सत्रासाठी डॉ. सोमाली मुखर्जी आणि प्रा. राहुल कांबळे यांनी संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी सॉफ्ट स्किल्सची संकल्पना, त्यांचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील त्यांची भूमिका याबाबत



सविस्तर माहिती दिली.डॉ. सोमाली मुखर्जी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रभावी संवादकौशल्य, आत्मविश्वासाने स्वतःचे विचार मांडणे, सकारात्मक देहबोली, सक्रिय ऐकण्याचे कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील संवादामध्ये योग्य शब्दांचा वापर, समोरच्या व्यक्तीचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकणे आणि परिस्थितीनुसार योग्य पद्धतीने प्रतिसाद देणे यांचे महत्त्व समजावून सांगितले.

प्रा. राहुल कांबळे यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, टीमवर्क, वेळेचे व्यवस्थापन, निर्णयक्षमता, समस्या निराकरण आणि कार्यक्षेत्रातील व्यावसायिक वर्तन याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक गुणांचे आत्मपरीक्षण करून त्यामध्ये सातत्याने सुधारणा करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच मुलाखती, समूहचर्चा, सादरीकरणे आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी सॉफ्ट स्किल्स किती महत्त्वाच्या आहेत, यावरही त्यांनी प्रकाश टाकला.सत्रादरम्यान विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. प्रश्नोत्तर, संवादात्मक चर्चा आणि विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विषय अधिक प्रभावीपणे समजावून देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी संसाधन व्यक्तींशी संवाद साधत आपल्या शंका व प्रश्न मांडले आणि त्यावर मार्गदर्शन प्राप्त केले.या सत्रामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बलस्थाने आणि सुधारणा आवश्यक असलेले पैलू ओळखण्यास, तसेच भविष्यातील करिअरसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास प्रेरणा मिळाली. शैक्षणिक ज्ञानासोबतच व्यावहारिक कौशल्यांचा विकास केल्यास विद्यार्थी अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि रोजगारक्षम बनू शकतात, हा महत्त्वपूर्ण संदेश या सत्रातून विद्यार्थ्यांना मिळाला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम, वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. विशाल देशमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वाणिज्य विभागाच्या या उपक्रमाचे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

# आंतरमहाविद्यालयीन मॉडेल मेकिंग स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स, खारघर येथे शुक्रवार (दिनांक ११ )रोजी ा बी.कॉम. मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या वतीने, उद्योजकता विकास कक्ष आणि नवी मुंबई कॉलेज असोसिएशन (NMCA) यांच्या संयुक्त विद्यमाने ‘संस्कृती जिथे परंपरा सर्जनशीलतेला प्रेरणा देते’ या संकल्पनेवर आधारित आंतरमहाविद्यालयीन मॉडेल मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

भारतीय संस्कृती, परंपरा आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम विद्यार्थ्यांच्या कलाकृतींमधून अनुभवायला मिळाला. विविध महाविद्यालयांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा



आणि कलात्मक कौशल्याचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली. सदर स्पर्धेचे परीक्षण डॉ. योगिता पाटील मॅडम आणि श्रीमती निलम मोरे मॅडम यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या विविध मॉडेल्सचे बारकाईने परीक्षण करून त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या बहुमूल्य वेळेबद्दल आणि विचारपूर्वक केलेल्या परीक्षणाबद्दल आयोजकांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या डॉ.महेश्वरी झिरपे मॅडम यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहन लाभले.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**नवीन पनवेल :** कॉलेजमध्ये जाणाऱ्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्यासोबत अश्लील कृत्य केल्याप्रकरणी



जाफरअली अनवरअली शेख (वय १९ राहणार नौपाडा, कामोठे) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात पोकसो अंतर्गत ८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपीने अल्पवयीन मुलीचा सिकेटी कॉलेज ते आसुडगाव येथील घरापर्यंत पाठलाग केला. आणि तिच्या इंस्टाग्राम आयडीवरून संपर्क करून तिला भेटण्यास बोलवले आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले. याबाबत आरोपी जाफरअली शेख याला पीडित मुलीच्या भावाने जाब विचारला असता त्याला ठार मारण्याची धमकी दिली.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

लग्नाचे आमिष दाखवून ३५ वर्षीय महिलेशी शारीरिक संबंध ठेवत तिच्याकडून वेळोवेळी सुमारे पाच लाख रुपये घेतल्याचा तसेच चार तोळे सोन्याच्या दागिन्यांचा अपहार केल्याचा प्रकार पनवेल परिसरात समोर आला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दिनकर रोकडे (रा. विरार, मुंबई) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२० ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आरोपीने सुखशांती नगर, उसर्ली, पनवेलजवळील एका इमारतीतील भाड्याच्या घरात तसेच रूम क्रमांक ४०८ येथे फिर्यादीशी संपर्क ठेवला. यावेळी त्याने लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. तसेच फिर्यादीकडून वेळोवेळी सुमारे पाच लाख रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादी राहत असलेल्या घरातील सुमारे चार तोळे सोन्याचे दागिनेही आरोपीने घेतल्याचा आरोप आहे. काही काळानंतर फिर्यादीने लग्नाबाबत तसेच दिलेले पैसे आणि दागिन्यांबाबत आरोपीकडे विचारणा केली. त्यावेळी आरोपीने तिला जीवे ठार मारण्याची तसेच तिचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ६९, ३१६ (२) आणि ३५१ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सपोनि सुनील वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# थर्माकोल मखरवर बंदी, तरीही मागणी कायम ; बाजारपेठेत चलती

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाने गेल्या काही वर्षांपासून थर्माकोल मखरवर बंदी आणली आहे. मात्र तरी देखील बाजारात थर्माकोलचे मखर उपलब्ध असून बाजारात त्याची मागणी कायम आहे.

गणेशोत्सव म्हटला की आनंदाचा, उत्साहाचा सण. गावातील प्रत्येक घरामध्ये गणेशोत्सव मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जातो. गणेशोत्सव साजरा करत असताना अनेक जण घरामध्ये आकर्षक सजावट करतात. काही ठिकाणी आकर्षक देखावे हे पुठ्ठा, कागद आणि अन्य साधनांपासून तयार करतात. थर्माकोल मखरवर बंदी असली तरी देखील काही ठिकाणी थर्माकोलचे मखर आणले जातात. पाच हजार रुपये पासून या मखराची सुरुवात होते. पनवेलच्या बाजारपेठेत थर्माकोल मखरची चलती आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने थर्माकोलच्या वापरावर निर्बंध असतानाही गणेशमूर्तींसाठी आकर्षक मखरांची मागणी कायम असल्याचे चित्र बाजारात पाहायला मिळत आहे.

थर्माकोल हलके, स्वस्त आणि सहज उपलब्ध असल्याने अनेक वर्षांपासून गणेशोत्सवातील सजावटीसाठी त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. विविध आकार, रंग आणि आकर्षक नक्षीकाम असलेली मखरे तयार करून विकली जात होती. मात्र, थर्माकोलमुळे पर्यावरणाला होणारे नुकसान लक्षात घेता त्याच्या वापरावर निर्बंध आणण्यात आले आहेत.

बदलत्या मागणीनुसार इतर साहित्यापासून बनवलेले आणि पर्यावरणपूरक साहित्याची विविध डिझाइन्स व्यापाऱ्यांनी बाजारात आणली आहेत. पारंपरिक सजावटीसोबतच आधुनिक डिझाइन्स, धार्मिक संकल्पना आणि आकर्षक रोषणाई असलेली मखरे ग्राहकांना उपलब्ध होत आहेत.



**पनवेल : कामोठे सेक्टर २० येथील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मध्ये डॉ. कु. आदिती म्हात्रे यांच्या 'आदिसंकल्प वेलनेस क्लिनिक'चे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले. याप्रसंगी रामदास म्हात्रे,विनायक म्हात्रे किसन म्हात्रे, अजय म्हात्रे,हिरामण म्हात्रे, हेमंत म्हात्रे,विजय म्हात्रे,देवधर मोकल, समिधा मोकल,संकल्प म्हात्रे,निर्भय मोकल, अमोल म्हात्रे व इतर मान्यवर उपस्थित होते.**



**पनवेल : गणेशोत्सवाच्या मंगलमयी पार्श्वभूमीवर उमरोली येथील भाजप युवा नेते सागरमढवी व नमिता मढवी यांनी तयार केलेल्या विशेष आरती संग्रह या पुस्तिकेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते शनिवारी प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी भाजप नेते सागर मढवी यांच्यासह नमिता मढवी, तेजल मढवी, प्रकाश मढवी , शांताराम चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**

# श्रीगणेशोत्सव आणि मनोरंजन क्षेत्र यांच्या नात्याची गोष्ट

**झूम प्रहर**

**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आजच्या श्रीगणेशोत्सवात हमखास दिसणारी फिल्मी गोष्ट म्हणजे मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक लहान मोठ्या सेलिब्रिटीजनी अनेक सार्वजनिक श्रीगणेशोत्सवांना भेटी देणे आणि श्रीगणेशाचे आशीर्वाद घेणे. अमिताभ बच्चनपासून एखाद्या मालिकेत काम करणाऱ्या नवोदित होतकरू कलाकारांना असं दर्शन घेणं एक प्रकारचा मानसिक, भावनिक आनंद देणारं. अभिनय क्षेत्रात काम करणाऱ्यांना ही गोष्ट चांगली पर्वणी असते.

सार्वजनिक श्रीगणेशोत्सव आणि मनोरंजन क्षेत्र यांचे नाते बहुस्तरीय आणि घट्ट आहे आणि मुंबईतच चित्रपटसृष्टी रुजली असल्याने ते साहजिकच आहे. चित्रपट, मालिका, वेबसिरीज यात पडद्यावर काय काय चाललंय त्यासह या क्षेत्रातील अशा अनेक गोष्टीही खूप महत्वाच्या असतात. याच श्रीगणेशोत्सवातील गर्दीतच वाट काढून नवीन चित्रपटाच्या पोस्टर्सचे अनावरणही केले जाते. चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीचा तो एक महत्त्वाचा घटक झाला आहे. अगदी पहिल्या दिवसापासून असं पोस्टर प्रकाशन सुरू होतं. सार्वजनिक श्रीगणेशोत्सवाच्या प्रवेशद्वारावर आगामी चित्रपटाच्या पोस्टर्स, होर्डिंग्ज यांचा देखावा उभा करण्याची परंपरा खरंतर फार पूर्वीपासूनची आहे. अगदी सत्तरच्या दशकातही श्रीगणेशोत्सवात धर्मेंद्र, जितेंद्र, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांच्या अनेक चित्रपटांची अशी पोस्टर्स, होर्डिंग्ज दिसत.

जनसामान्य प्रेक्षकांपर्यंत आपला चित्रपट पोहचवण्याचा तो एक भाग आहे. चित्रपटाची प्रसिद्धी एक वैशिष्ट्यपूर्ण व्यापक गोष्ट असून त्यात एक महत्वाचा घटक श्रीगणेशोत्सवातील चित्रपट प्रसिद्धी आहे. याच परंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे श्रीगणेशोत्सवातील गल्ली चित्रपट. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला अथवा जेन झी आणि जेन अल्फा पिढीला गल्ली क्रिकेट माहित असेल, कारण आजही शहरातील लहान मोठ्या गल्लीत, मैदानावर रबरी वा टेनिस चेंडूवरील क्रिकेट खेळले जाते. देश-विदेशातील काही क्रिकेटर्सही अशा गल्ली क्रिकेटमध्ये क्षणभर सहभागी होतात याचे समाज माध्यमातून रिल पाहायला मिळते. त्याला भरभरुन लाईक्स मिळतात, अपेक्षेप्रमाणे काही चांगल्या तर काही वाह्यात कॉमेन्टस येतात. (असं करण्यात काय बरे आनंद मिळतो हे त्यांनाच ठाऊक. देव त्यांना सद्बुद्धी देवो.) मात्र "गल्ली चित्रपट" राहिलाय आठवणीपुरता. एक भन्नाट व भारी संस्कृती होती हो. खासकरून श्रीगणेशोत्सवाचा तो एक अविभाज्य भाग झाला होता.

आज आपल्या वयाची पन्नाशी, साठी ओलांडलेल्यांना चित्रपट रसिकांना फ्लॅशबॅकमध्ये जात आठवत असेल साठ सत्तरच्या दशकात मुंबई, ठाणे, वसई, विरार, डोंबिवलीतील श्रीगणेशोत्सवातील हुकमी मनोरंजन म्हणजे गल्ली चित्रपट. कुठे ताडपत्रीवर बसून तर कुठे खुर्चीची व्यवस्था. वा घरचीच खुर्ची वा टेबल घ्यायचे. कोणी चक्क वृत्तपत्राच्या कागदाचा त्यासाठी वापर करे. कसं का असेना पिक्चर बघायला मिळाला की पुरे. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील हीदेखील एक रंजक गोष्ट.

श्रीगणेशोत्सव मंडळाच्या मंडपात वा बाहेर रस्त्यावर, मैदानावर मधोमध सोळा एमएमचा पडदा लावून "पिक्चर" दाखवला जाई. काही ठिकाणी प्रोजेक्शनच्या बाजूला महिला प्रेक्षक तर पडद्याच्या पलीकडे पुरुष प्रेक्षक. तिकडे चित्र उलटे दिसे तरी कोणाचीच हरकत नसे. पिक्चर एन्जॉय करायला मिळतोय ना, बस्स. मन भरुन आनंद होई. पलीकडून दिलीपकुमार, राज कपूर, देव आनंद, राजकुमार, सुनील दत्त, धर्मेंद्र, राजेश खन्ना हे डावरे दिसले तरी त्यांची अदाकारी उजवी असे. अमिताभ बच्चन उजव्या हाताने ढिश्यूम ढिश्यूम करताना दिसे. पब्लिक चिक्कार असे. खचाखच गर्दी असे आणि टाळ्या शिट्ट्या हंशा हमखास असे. ती संस्कृतीच मोकळी ढाकळी व वेगळी होती. अनेक ठिकाणी पडद्याच्या पलिकडचा प्रेक्षकांवर छत नसल्यास पावसाचा व्यत्यय आल्यावर हिरमोड होई. तरी पडद्यावरुन लक्ष हटत नसे. पिक्चर पाहायला आलोय हे भान महत्वाचे असे.



काही ठिकाणी पडद्याबाहेर दृश्य जाई. तरी विनातक्रार चित्रपट पाहणे सुरु राही. कुठे चाळीतील गॅलरीतून, ओटीवर, पायरीवर बसून पिक्चर एन्जॉय केले जात. रात्रीची आरती झाल्यावर दहानंतर हे पिक्चर सुरु होत आणि एकपर्यंत संपत. एका अधिकृत मध्यंतरसह आणखीन दोन अनधिकृत मध्यंतर असत. कारण एक रिळ संपल्यावर दुसरे तिळ लावावे लागे. त्या रिळाकडेही कुतुहलाने पाहिलं जाई. प्रोजेक्शनवाला दिवसभरात कुठे भेटलाच तर त्याच्याकडून आज कोणत्या गल्लीत कोणता पिक्चर आहे हे हमखास विचारले जाई. सत्तरच्या दशकात साधारण अडीचशे, तीनशे रुपयांत गल्लीतील एका चित्रपटाचे आयोजन होत असे. (पन्नास वर्षापूर्वी ही रक्कम खूपच मोठी होती. पालकांना विचारुन बघा. त्या काळात मध्यमवर्गीय कुटुंबात मासिक साडेसातशे रुपये पगार भारी वाटत असे.) वर्गणी देताना काही चित्रपटप्रेमी फुकाचा सल्ला देत, दादा कोंडकेंचे सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, पांडू हवालदार पिक्चर दाखवा, खूप जुन्या पिढीतील व पठडीतील चित्रपट रसिक सांगे, झनक झनक पायल बाजे, नवरंग, पिंजरा असे म्युझिकल सुपरहिट चित्रपट दाखवा.


अर्थात मतस्वातंत्र्य असल्याने ते वापरायला हवेच. काही श्रीगणेशोत्सवात मंडळे स्मरणिकेत कार्यक्रमात स्थानिक कार्यक्रम, वाद्यवृंद, नाटक यासह चित्रपटाच्या तारखा दिल्या जात. अनंत चतुर्थीच्या आदल्या संध्याकाळी महाआरती असल्यानेच त्या दिवशी हमखास एक चित्रपट दाखवणे निश्चित असे. कारण आरतीला उशीर झाला तरी चित्रपटासाठीच्या पूर्वतयारीला फारसा वेळ लागत नसे. आणि रात्री उशीरा पिक्चर संपल्यावर काही स्वयंसेवक मंडपातच झोपत. आपली चाळ वा गल्ली सोडून इतरत्र पिक्चर एन्जॉय करायला गेलेले इतक्या रात्रीही पाहिलेल्या पिक्चरवर गप्पा करत करत घरी येत, बरेचजण ओटीवर झोपत. दुसऱ्या दिवशी वाडीच्या नाक्यावर, मंडपात कोपऱ्यात रात्री एन्जॉय केलेल्या नि आजच्या रात्रीच्या वाद्यवृंद वा नाटकावर चर्चा होई. दहा दिवसाच्या श्रीगणेशोत्सवात जवळपास प्रत्येक मंडळात दोन हिंदी व एक मराठी चित्रपट असे दाखवले जात. कुठे फक्त आणि फक्त मराठी चित्रपट दाखवत. मराठी बाणा असाही होता.

मी गिरगावातील खोताची वाडीत लहानपणापासून ही गल्ली चित्रपट संस्कृती अनुभवत मोठा झालो. ते दिवसच वेगळे होते. शेजारच्या आंबेवाडीत हमखास आर. के. फिल्म बॅनरचा म्युझिकल सुपरहिट चित्रपट पाहायला मिळत असे. बरसात, श्री ४२०, जिस देश मे गंगा बहती है मी तेथेच पाहिले. रामचंद्र बिल्डिंगमध्ये एका वर्षी जीने की राह, पुढच्याच वर्षी वारीस, मग एका वर्षी खिलौना पाहिला. याच बिल्डिंगमध्ये जितेंद्र लहानाचा मोठा झाला याचे ज्ञान होते, तोच आपल्या या चाळीसाठी दरवर्षी एक चित्रपट भेट देतो हेदेखील समजले. आज या सुंदर भवन इमारतीचे नूतनीकरण करण्यात येत आहे आणि तरीही जितेंद्र आपल्या या जुन्या राहणीमानाला अजिबात विसरला नाही. श्रीगणेशाच्या पहिल्या दिवशी त्याच्याच शुभ हस्ते श्रीगणेश मूर्तीची पूजा करून स्थापना करण्यात येते. राजेश खन्ना मुळचा आमच्या गिरगावातील ठाकूरव्दार नाक्यावरील सरस्वती निवासचा रहिवासी. त्यामुळेच गिरगावातील प्रत्येक गल्लीत त्याचा एक पिक्चर दाखवायचाच असा अलिखित नियम होता. प्रेम प्रेम म्हणतात ते हेच असते.

आपल्या देशात १९८२ साली रंगीत दूरदर्शन व व्हिडिओ यांचे आगमन झाले आणि गल्ली चित्रपट संस्कृतीत आता बदल होत होत गेला. पडद्याची जागा व्हीसीआरने घेतली. एका दिवसाचे दहा रुपये भाडे अशा पध्दतीनुसार चित्रपटाची कॅसेट हाती आली. वातावरण बदलले. आजच प्रदर्शित झालेल्या नवीन चित्रपटाची कशी कोण जाणे पण संध्याकाळपर्यंत कॅसेट उपलब्ध होऊ लागली (ती चोरट्या मार्गाने येते म्हटले गेले पण चित्रपटसृष्टीने त्यावर काही कठोर कारवाई वा उपाययोजना केली का? फक्त चर्चा होत राहिली.) व्हिडिओ कॅसेट युगात मिथुन चक्रवर्तीच्या डिस्को डान्स व देमार घेमार मसालेदार मनोरंजक चित्रपटांना भारी मागणी व्हायची. कोणत्या हीरोचे मार्केट कुठे असेल काही सांगता येत नाही. एका रात्रीत मिथुनचे तीन पिक्चर व्हिडिओवर एन्जॉय केले जाऊ लागले आणि गल्ली चित्रपट संस्कृती "पडद्याआड" गेली. आज अनेक सेलेब्रिटीजच्या घरचा गणपती, त्याचे आगमन आणि विसर्जन या गोष्टी खूप महत्त्वाच्या असतात. सलमान खानच्या घरचा गणपती विशेष उल्लेखनीय. सर्वधर्मसमभाव साधणारा. माधुरी दीक्षित, शिल्पा शेट्टी, सोनाली बेंद्रे यांच्या घरच्या गणपतीची पूजा प्रसारमाध्यमांतून दिसते. अनेक मराठी कलाकार आपल्या लहानपणीच्या श्रीगणेशोत्सवाच्या आठवणी सांगतात. पुणे शहरातील श्रीगणेशोत्सवात श्रुती मराठे, संस्कृती बालगुडे, तेजस्वीनी पंडित यांचे उत्साही ढोल वाजन विशेष उल्लेखनीय. त्यासाठी लागणारी क्षमता, सातत्य व आवड त्यांच्याकडे आहे. इन्स्टाग्रामवर अनेक सेलिब्रिटीजच्या श्रीगणेश दर्शन, पूजन यांच्या भरपूर पोस्ट पाहायला मिळतील. त्यात हौसमौज जास्त असेल. श्रीगणेशोत्सव मिरवणुकीत डीजे वादनाबद्दलही कलाकारांनी मते व्यक्त केली. हल्ली कोणत्याही गोष्टीवर मत व्यक्त करायचं तर ट्रोलर टपलेले असतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणं हिताचं. त्यांना गणपती बुध्दी देवो. श्रीगणेशोत्सव आणि मनोरंजन क्षेत्र यांच्या नातेसंबंधांची गोष्ट बरीच मोठी आहे. मनोरंजन क्षेत्राचा हाही एक रंग आहे.








# पर्यावरणपूरक गणेशोत्सव काळाची गरज

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले. महाराष्ट्र शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव'म्हणून घोषीत केल्यामुळे या उत्सवाचा उत्साह द्विगुणीत झाला आहे, परंतु हा उत्सव साजरा करताना नागरिकांची सुरक्षितता, कायद्याचे पालन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी भक्तिभाव कायम ठेवून शिस्तबद्ध रीतीने आणि सामाजिक भान जपून पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे काळाची गरज आहे.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केल्यानंतर यंदाच्या वर्षी हा उत्सव अधिक व्यापक, नियोजनबद्ध आणि लोकसहभागातून साजरा होण्यासाठी सर्व शासकीय विभाग प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैभव राज्याच्या सीमेपलीकडे पोहोचवण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'लोककलेतील श्री गणेश' आणि 'महा गणेशोत्सव महाराष्ट्राचा राज्य उत्सव' अंतर्गत देशातील विविध शहरांमध्ये विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. चेन्नई, सिल्वासा, कोलकाता आणि हैदराबादमध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राज्यातील विविध कला, संस्कृती आणि लोकपरंपरांना चालना देणारे कार्यक्रम, शाडूच्या मूर्ती तयार करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन, 'इको-फ्रेंडली गणेश मूर्ती रंगरंगोटी महोत्सव, हातकागद कला संवर्धन, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम, हस्तकला प्रदर्शन, सामाजिक जनजागृती आणि विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. हा संदेश व्यापक स्वरुपात पोहोचविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे नवी मुंबईत 'पर्यावरणपूरक महागणेशमूर्ती कार्यशाळा' घेण्यात आली. १० हजारांहून अधिक शालेय विद्यार्थी आणि नागरिकांनी एकाच वेळी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्यभर व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाडू माती किंवा नैसर्गिक मातीच्या गणेशमूर्तींना नागरिकांनी प्राधान्य देणे आवश्यक आहे. मूर्ती विसर्जनासोबत निर्माल्य संकलन, कचरा व्यवस्थापन आणि मंडप परिसराची स्वच्छतेकडेही गांभीर्याने पाहावे लागेल. जलस्रोतांचे संवर्धन नदी, तलाव आणि अन्य जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाच्या वतीने मूर्ती संकलन व




'मूर्तीदान'उपक्रम राज्यभर राबवण्यात येतो. या उपक्रमाला नागरिकांनी आणि गणेशोत्सव मंडळांनी सहकार्य करायला हवे. घरगुती मूर्तीचे विसर्जन घरच्या घरी किंवा कृत्रिम तलाव, कुंड अशा पर्यायी व्यवस्थेत करणे पर्यावरणाच्या दृष्टीने उपयुक्त आहे. भक्तिभाव कायम ठेवून जलस्रोतांचे संरक्षण करण्याचा संदेश या माध्यमातून देता येईल.

यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध भागांत डीजे आणि लेझरमुक्त उत्सवासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. मर्यादेपेक्षा अधिक तीव्रतेच्या आवाजामुळे, लहान बालके, गरोदर माता, ज्येष्ठ नागरिक आणि हृदयविकाराच्या रुग्णांना धोका पोहचल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी ध्वनी मर्यादेचे पालन करणे गरजेचे आहे. पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम, झांज पथक, पोवाडे, शिवकालीन कला, लोकनृत्य आणि विविध लोककलांच्या सादरीकरणावर भर दिल्यास लोककला जपल्या जातील. तसेच स्थानिक लोककलाकारांना रोजगाराची संधी मिळवून देण्याचे सत्कार्य घडेल. यामुळे 'तीव्र आवाज टाळूया.. संस्कृतीचा गजर करूया' ही गणेशोत्सवाला ओळख देता येईल.

अतितीव्र लेझरच्या प्रकाशामुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा पोहचली आहे, तर काहींना डोळे गमवावे लागले आहेत. त्यामुळे आकर्षक रोषणाई करताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे अत्यावश्यक आहे. लेझरचा वापर टाळून सुरक्षित प्रकाशयोजनेला प्राधान्य द्यावे. यंदा डीजेसोबत लेझर लाईटच्या वापराबाबतही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उत्सवातील आकर्षण वाढवताना नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे. गणेशोत्सव मंडळे ही समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यमे आहेत. शासकीय योजनांची माहिती, रक्तदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता, वृक्षारोपण, महिला व बालसुरक्षा, व्यसनमुक्ती आणि वाहतूक शिस्त यांसारख्या विषयांवर आधारित संदेश जास्तीत जास्त मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवावा. 'माझा गणपती माझी सामाजिक जबाबदारी' हा विचार प्रत्येक मंडळाकडून पोहोचवता येईल.

राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नियोजन आणि जनजागृतीला चालना देण्यात येत आहे. 'एक गाव, एक गणपती'सारख्या विधायक संकल्पनांसोबत घरगुती गणेशमूर्तीसाठी माती, धातू, संगमरवर किंवा अन्य पर्यायी मूर्तींचा विचार, कृत्रिम विसर्जन स्थळांचा वापर, मूर्ती व निर्माल्य संकलन आणि योग्य व्यवस्थापन याबाबत गावपातळीवर प्रबोधन करण्यात येत आहे. आशा, अंगणवाडी सेविका, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामपंचायत यांचा लोकसहभाग या उपक्रमाला व्यापक स्वरुप देत आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत साधारणपणे सन २०१५ पासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन यंदाही उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कुटुंबे आणि गणेशोत्सव मंडळांनी मूर्तीदान, निर्माल्य संकलन आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करून गटविकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने संनियंत्रण व मार्गदर्शन करण्यात येत आहे. सन २०२५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २ लाख ९१ हजार ३१९ घरगुती तर २ हजार ४१० सार्वजनिक गणेशमूर्ती अशा एकूण २ लाख ९३ हजार ७२९ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. यासोबतच ३८५ घंटागाड्या आणि एक हजार ३५२ ट्रॉलीद्वारे निर्माल्य संकलन करण्यात आले आहे. उत्सवादरम्यान डीजे नियमांचे उल्लंघन, वादविवाद, मारामारी, रस्त्यावरील बेशिस्त वर्तन, वाहतूक नियमांचे उल्लंघन, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन आणि हुल्लडबाजी, महिलांची छेडछाड, सोशल मीडियावरील आक्षेपार्ह पोस्ट अशा गैरप्रकारांमुळे गुन्हे दाखल होऊ शकतात.

**-वृषाली पाटील, सहायक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# पोलिसांच्या नियोजनामुळे माणगावात वाहतूक कोंडीला बसला आळा

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माणगाव शहरात वाढणारी वाहनांची वर्दळ लक्षात घेऊन माणगाव पोलिसांनी केलेल्या नियोजनाचा चांगला परिणाम दिसून येत आहे. शहरातील नेहमी वाहतूक कोंडी होणाऱ्या निजामपूर रोड, मोरबा रोड तसेच मुख्य बाजारपेठेत यंदा वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरळीत राहिली आहे. पोलिसांनी वाहनांच्या मार्गात आवश्यक ते बदल करून तसेच हातगाड्या, रिक्षा आणि एसटी वाहतुकीचे योग्य नियोजन केल्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीवर प्रभावीपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.



माणगाव बाजारपेठेत निजामपूर रोड आणि मोरबा रोड परिसरात नियमितपणे वाहनांची मोठी गर्दी होत असते. गणेशोत्सवाच्या काळात ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता होती. मात्र पोलिसांनी वाहतुकीचा अभ्यास करून आधीच पर्यायी मार्ग निश्चित केले. त्यामुळे वाहनांची गर्दी एका ठिकाणी साचण्याऐवजी विविध मार्गांवर विभागली गेली.खोपोलीमार्गे तसेच पुण्याकडून महाडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना निजामपूर रोडवरून बायपासच्या दिशेने वळविण्यात आले आहे.

त्यामुळे ही वाहने माणगाव बाजारपेठेत प्रवेश न करता थेट बायपासमार्गे पुढे जात आहेत. परिणामी निजामपूर रोड तसेच बाजारपेठेतील वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक सुरळीत राहण्यास मोठी मदत झाली आहे.मुंबई-गोवा महामार्गावरून श्रीवर्धनच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांसाठीही पोलिसांनी स्वतंत्र नियोजन केले आहे. एमआरएफ टायरच्या बाजूने वाहनांना योग्य मार्गाने वळविण्यात आले असून त्यामुळे मुख्य वाहतूक प्रवाहावर अतिरिक्त ताण येत नाही. तसेच खरवली मार्गे श्रीवर्धनकडे जाणाऱ्या वाहनांसाठी हॉटेल ओपन अम्ब्रेलाच्या समोरून वाहतूक वळविण्यात आली आहे. विविध दिशांनी येणारी वाहने वेगवेगळ्या मार्गाने पुढे पाठविल्यामुळे शहरातील मुख्य चौक आणि बाजारपेठेवर होणारा वाहतुकीचा दबाव कमी झाला आहे.गणेशोत्सवाच्या काळात एसटी बसची वर्दळही मोठ्या प्रमाणात वाढते.

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटी बसना नेहमीच्या एसटी स्थानकात थांबा न देता पेट्रोल पंपाच्या शेजारी तात्पुरता बसथांबा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे एसटी बसमुळे बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यास मदत झाली आहे. बाजारपेठेतील हातगाड्या आणि रिक्षांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी त्यांचेही योग्य नियोजन केले आहे. अनियंत्रितपणे रस्त्यावर वाहने व हातगाड्या उभ्या राहणार नाहीत याची दक्षता घेतली जात आहे. त्यामुळे पादचारी तसेच वाहनचालकांना बाजारपेठेतून मार्गक्रमण करणे सोपे झाले आहे. गणेशोत्सवाच्या काळात माणगाव शहरात मोठ्या प्रमाणात नागरिक, भाविक आणि वाहनांची वर्दळ असतानाही वाहतूक कोंडी टाळण्यात पोलिसांचे नियोजन महत्त्वपूर्ण ठरले आहे.

संभाव्य गर्दीच्या ठिकाणांचा आधीच अभ्यास करून वाहनांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, एसटीसाठी स्वतंत्र थांबा करणे तसेच बाजारपेठेतील रिक्षा आणि हातगाड्यांचे नियोजन करणे या उपाययोजनांमुळे माणगाव शहरातील वाहतूक व्यवस्था सध्या सुरळीत सुरू आहे.

## सत्य आणि प्रामाणिक प्रयत्नातूनच यश -आमदार महेश बालदी

**चौक : प्रतिनिधी**

प्रत्येकाने आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी सत्य, मेहनत व प्रामाणिक प्रयत्न केल्यास विनोद भोईर यांच्यासारखे यशस्वी समाजसेवक व उद्योगपती निर्माण होतात, असे गौरवोद्गार आमदार महेश बालदी यांनी काढले. भारतीय जनता पक्षाचे वडगाव पंचायत समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक व उद्योगपती विनोद भोईर यांच्या आर. के. डेव्हलपर्स (राधा कृष्ण डेव्हलपर्स) या नवीन कार्यालयाचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

ज्येष्ठ समाजसेवक, उद्योगपती विनोद भोईर यांनी चौक-तुपगाव रस्त्यावर तुपगाव येथे अत्याधुनिक नवीन कार्यालय बांधले आहे. लहानपणी वडिलांचे छत्र हरपल्यानंतर विनोद व बाबू भोईर यांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि कष्टाने व्यवसाय वृद्धिंगत केला. आपल्या व्यवसायातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष व उद्योगपती सुधीर ठोंबरे, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, उद्योगपती यासीन भालदार, प्रविण कालबागे, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगपती, विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



## गणेशोत्सवात इकोफ्रेंडली मखरांचा थाट; थ्रीडी अन् मेटल थीम

**पाली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत गणरायाची आरास, विविध मखर आणि सजावटीच्या साहित्याची मोठी आवक झाली आहे. विशेष म्हणजे थर्माकोल आणि प्लास्टिकला फाटा देत नागरिकांचा कल आकर्षक पर्यावरणस्नेही मखरांकडे वाढल्याचे दिसून येत आहे. विविध थ्रीडी प्रकार आणि धातूचा (मेटल) आभास निर्माण करणाऱ्या थीममधील मखरांना मोठी मागणी असून मखर विक्री आणि निर्मितीतून लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.



प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने पाऊल टाकत अनेक सजग व्यावसायिक, कलाकार आणि कारागिरांनी विघटनशील वस्तूंचा वापर करून हे मखर तयार केले आहेत. पुठ्ठा, सनबोर्ड, प्लायवूड, मखमली व जरीचे कापड, गादीचा फोम आणि कापडी फुलांचा वापर करून बनवलेले हे मखर टिकून राहणारे आणि खिशाला परवडणारे आहेत. हे मखर फोल्डेबल असल्याने ते सहजरीत्या कुठेही नेता येतात, तसेच त्यांचा पुनर्वापर करणे शक्य असल्याने नागरिक याला पहिली पसंती देत आहेत. गवतापासून बनवलेले मखर तसेच किल्ल्याच्या प्रवेशद्वाराची प्रतिकृती असलेले मखरदेखील विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

थ्रीडी मखरांमध्ये रंग, पीओपी, प्लायवूड आणि एलईडी रोषणाईचा वापर करण्यात आला आहे. यात स्वामी समर्थ, विठ्ठल-रुक्मिणी कलाकृती आणि मोराच्या आकारातील मखरांना मोठी मागणी आहे. या मखरांच्या किमती १५०० रुपयांपासून सुरू होऊन १५ ते २० हजार रुपयांपर्यंत आहेत. कापडी मखर विविध आकारांत उपलब्ध असून ते धुऊन पुन्हा वापरता येतात. त्यांची किंमत १००० रुपयांपासून पुढे आहे.विशेष आकर्षण ठरणाऱ्या मेटल थीम मखरांबद्दल सांगताना जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे कलाकार ओमकार कदम यांनी स्पष्ट केले की, पुठ्ठ्यापासून बनवलेले हे मखर पाण्यात सहज विरघळणारे आहेत.

त्यावर गोल्डन, ब्राऊन-ब्लॅक रंग आणि लॅकर फिनिशिंग दिल्याने ते अगदी धातूसारखे दिसतात. त्रिशूळ, शंकराची पिंड, त्रिमूर्ती, नदी, विठ्ठल आणि मंदिरांच्या विविध कलाकृतींमधील या मखरांना पुणे-मुंबईतूनही मागणी आहे.

## गणेशोत्सवासाठी रोहा तालुका सज्ज; बाजारपेठा सजल्या

**रोहा : प्रतिनिधी**

कोकणवासीयांचा सर्वांत प्रिय असा गणेशोत्सव सोमवारपासून सुरू होत आहे. या गणेशोत्सवानिमित्त रोहा तालुक्यातील गणेशभक्त बाप्पाच्या आगमनासाठी सज्ज झाले आहेत. मुंबई, पुणे व अन्य शहरांत व्यवसाय, नोकरी व शिक्षणानिमित्त असलेले मूळचे रोह्यातील नागरिक गणेशोत्सवानिमित्त आपल्या गावी येताना दिसत आहेत. खासगी बस, एसटी महामंडळाची बस, रेल्वे व स्वतःच्या चारचाकी वाहनाने भाविक आपल्या गावी आले आहेत, तर काही येताना दिसत आहेत.



त्यामुळे वाहनांची वर्दळ रोहा तालुक्यात वाढली आहे. गणेशोत्सवापूर्वीच शनिवार, रविवार सुट्टी आल्याने यावेळी गणेशाची सजावट करण्यासाठी भाविकांना वेळ मिळाल्याने ते लवकरच आपल्या गावी आल्याचे दिसून येत आहे. घराची साफसफाई, रंगरंगोटीसह अन्य कामे करताना नागरिक दिसत आहेत.गणेशोत्सवानिमित्त रोहा, कोलाड, नागोठणे, चणेरा येथील बाजारपेठा विविध साहित्याने सजल्याचे दिसून येत आहेत.

# वडवळच्या तीन विद्यार्थिनींची दिल्लीतील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**चौक : प्रतिनिधी**

टाइम्स ऑफ इंडिया आणि एएम/एनएस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय तार्किक विचार चाचणी परीक्षेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडवळ येथील विद्यार्थिनींनी देदीप्यमान यश संपादन केले आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या तीन विद्यार्थिनींची नवी दिल्ली येथील अंतिम फेरीसाठी निवड झाली असून खालापूर तालुक्यासह जिल्ह्यात सर्वत्र या मुलींचे कौतुक होत आहे.



शाळेत इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन फेऱ्यांमध्ये या चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत कठीण आणि स्पर्धात्मक असलेल्या दुसऱ्या फेरीत शाळेतील कु. स्नेहा सचिन कदम (इ. ७ वी), कु. वैष्णवी रघुनाथ चाळके (इ. ७ वी) आणि कु. वीरा प्रवीण मरागजे (इ. ६ वी) या तीन विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवत राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. सदर गुणवंत विद्यार्थिनींसोबत त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका जयश्री राजाराम सुर्वे या दिल्ली येथे रवाना होणार आहेत.

१६ सप्टेंबर रोजी हे पथक दिल्लीसाठी प्रस्थान करेल. नवी दिल्ली येथील प्रधानमंत्री संग्रहालय येथे १८ आणि १९ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीतील चाचणी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार समारंभ पार पडणार आहे.या यशासाठी खालापूर तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी राजवर्धन नाईक व पोषण आहार अधीक्षक दीपा परब, देवन्हावे केंद्राच्या केंद्रप्रमुख सुकाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांनी सर्व विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या. शाळा व्यवस्थापनात मोलाची भूमिका बजावणारे मुख्याध्यापक सुधाकर थळे, विषयशिक्षिका जयश्री सुर्वे, उपशिक्षिका करुणा बोंबे, हर्षा काळे व उपशिक्षक नारायण बोडेकर यांनी या विद्यार्थिनींच्या यशासाठी विशेष मेहनत घेतली.

## गणेशोत्सवासाठी चाकरमानी कोकणाकडे रवाना

### ◆ खोपोली-पाली महामार्गावर वाहनांच्या रांगा

**पाली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई येथून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या वाहनांमुळे शनिवारी (दि. १२) वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मुंबई-गोवा महामार्गाला एक उत्तम आणि वेळेची बचत करणारा पर्याय म्हणून चाकरमानी खोपोली-पाली मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत.



यामुळे सध्या परळी, नाणोसे गावापासून ते गोंदाव फाट्यापर्यंत तसेच परळी ते पेडली आणि पाली ते नांदगाव आदी ठिकाणी वाहनांची प्रचंड वर्दळ पाहायला मिळत आहे. चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा आणि वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्यावर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. विशेषतः पाली, पेडली, परळी आणि नांदगाव या संवेदनशील ठिकाणी पोलिसांकडून वाहतुकीचे विशेष नियोजन करण्यात आले आहे.

मुख्य बाजारपेठांमध्ये पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड तैनात करण्यात आले असून स्थानिक तरुणांचीही वाहतूक नियंत्रणासाठी मदत घेतली जात आहे. कोकणात जाणाऱ्या चालकांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी पाली पोलिसांच्या वतीने जागोजागी दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक व्यवस्थेची पाहणी करत आहेत.

**गणपती सणासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये यासाठी मुख्य बाजारपेठांसह महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. सुरळीत वाहतुकीसाठी अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांचीही मदत घेण्यात आली आहे.**

**-उत्तम रिकामे,**
**पोलीस निरीक्षक, पाली**

## श्रीगणेशोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर कर्जत पोलिसांचा रूट मार्च

**कर्जत : प्रतिनिधी**

सोमवारपासून श्री गणेशोत्सव सुरु होणार आहे. या उत्सवात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये. तसेच श्री गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा. यासाठी कर्जत पोलीस ठाण्याच्या वतीने कर्जत शहरात रूट मार्च काढण्यात आला. कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा रूट मार्च काढण्यात आला. 'आपला गणपती आपली जबाबदारी' या धर्तीवर श्री गणेशोत्सव साजरा करावा यासाठी हा रूट मार्च महत्वाचा ठरणार आहे.



## गणेशोत्सवानिमित्त श्रीसदस्यांनी केले रोहा शहर चकाचक; २७ टन कचरा केला गोळा

**धाटाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने शुक्रवारी रोहा-अष्टमी नगरपालिकेच्या शहरातील बसस्थानक, रेल्वे स्टेशन तसेच प्रमुख व उपरस्त्यांची स्वच्छता करण्यात आली.




या स्वच्छता अभियानाला प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अभियानात एकूण ४१२ श्री सदस्य सहभागी झाले. त्याचबरोबर २८ सरकारी पदाधिकारी व कर्मचारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत राबविण्यात आलेल्या या अभियानात तब्बल २७ टन कचरा गोळा करून डंपिंग ग्राउंडमध्ये नेण्यात आला.

गणेशोत्सवाच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची व नागरिकांची वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ठिकाणे व रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनीही स्वच्छता अभियानात सहभागी होऊन श्री सदस्यांना सहकार्य केले.

रोहा-अष्टमी नगराध्यक्षा कु. वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, नगरसेवक मयूर दिवेकर, नगरसेविका सुप्रिया जाधव, जितेंद्र पडवळ, तसेच रोहा एस.टी. डेपो व्यवस्थापक सुनील सिताराम शेडगे आदी उपस्थित होते.

## साले गावचा एक गाव एक गणपती; १२६ वर्षांची परंपरा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील साले गावातील ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने एक गाव एक गणपती ही संकल्पना गेली अनेक वर्षे राबवली आहे. ही परंपरा गेल्या १२६ वर्षांपासून सुरू आहे. ग्रामस्थांनी आपल्या या कृतीतून एक वेगळे अनुकरणीय पाऊल टाकत सर्वांपुढे आदर्श उभा केला आहे.गणेशभक्तांच्या नवसाला पावणारा म्हणून या गणपतीची ओळख आहे. म्हणूनच दरवर्षी या गणपतीच्या दर्शनाला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात.



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगावपासून अवघ्या चार किमी अंतरावर असलेले अत्यंत छोटे व निसर्गरम्य असे हे साले गाव आहे. साले गावाच्या पश्चिमेला शिवगणेश मंदिर आहे. गेल्या वर्षी गावाने बोललेले सामूहिक व वैयक्तिक नवस फेडले जातात. पुन्हा नव्याने भक्त आपापले वैयक्तिक नवस बोलतात अशी प्रथा आहे. दुपारी एकनंतर सजवलेल्या पालखीतून पूर्वापार प्राचीन असणारी ही गणेशाची मूर्ती मंदिरालगत असलेल्या शिवकालीन तलावातून छातीभर पाण्यातून शंखनाद व मोरयाच्या गजरात फिरवली जाते.

# गणेशभक्तांना वाहतूक कोंडीचा फटका

## पळस्पे पुलावर अवजड वाहनांच्या तीन रांगा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवासाठी कोकणाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांची संख्या वाढताच पनवेलमध्ये वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र शुक्रवारी रात्री पाहायला मिळाले. जेएनपीटी-पळस्पे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली असून पळस्पे पुलाच्या परिसरात अवजड वाहने तब्बल तीन रांगांमध्ये उभी करण्यात आल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला. या कोंडीचा फटका पुलापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरापर्यंत जाणाऱ्या वाहनांना बसला.

गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक कोकणाकडे रवाना होत आहेत. शुक्रवारी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास जेएनपीटी-पळस्पे महामार्गावर वाहनांची संख्या अचानक वाढली आणि त्यानंतर हळूहळू वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. पळस्पे पुलाच्या परिसरात पोहोचण्यापूर्वीच शेकडो वाहने वाहतूक कोंडीत अडकली होती.

या कोंडीत खासगी प्रवासी बस, एसटी महामंडळाच्या बसेस तसेच मोठ्या संख्येने कार आणि इतर हलकी वाहने अडकली होती. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध असल्याने पळस्पे पुलाच्या परिसरात मोठ्या संख्येने अवजड वाहने थांबविण्यात आली होती. मात्र, ही वाहने महामार्गावर तीन रांगांमध्ये उभी राहिल्याने उपलब्ध रस्त्याचा मोठा भाग व्यापला गेला आणि कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीचा वेग मंदावला.

एकीकडे कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची वाढती संख्या आणि दुसरीकडे महामार्गावर थांबविण्यात आलेली अवजड वाहने यामुळे वाहतूक कोंडी अधिकच वाढत गेली. वाहतूक पोलिसांकडून गणेशोत्सवासाठी विशेष नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले असले तरी प्रत्यक्षात वाहनांची संख्या वाढल्यानंतर या नियोजनावर मोठा ताण आल्याचे दिसून आले. कोंडीत अडकलेल्या वाहनचालकांना बराच वेळ महामार्गावरच थांबावे लागले. रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने प्रवासी आणि बसेस रस्त्यावर अडकल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली.

गणेशोत्सवाच्या पुढील दिवसांत कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पळस्पे पुलाच्या परिसरात अवजड वाहने थांबविताना मुख्य वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# पनवेल पोलिसांनी १०७ तोळे सोने, ७ वाहने अन् १४३ मोबाईल केले नागरिकांना परत



**पनवेल : वार्ताहर**

गुन्ह्यांचा तपास पूर्ण करून जप्त मुद्देमाल मूळ मालकांपर्यंत पोहोचविण्यात पनवेल पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. पनवेल शहर, पनवेल तालुका आणि खांदेश्वर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध प्रकरणांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल २ कोटी ७ लाख ५७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल संबंधित तक्रारदार आणि नागरिकांना परत करण्यात आला.

पनवेल विभागातील प्रलंबित मुद्देमालाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तो विनाविलंब संबंधितांच्या स्वाधीन करण्याचे निर्देश परिमंडळ-३, पनवेलच्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त मयुर भुजबळ यांना दिले होते. त्यानुसार तीनही पोलीस ठाण्यांनी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत मुद्देमाल निर्गतीची कार्यवाही केली.

या कारवाईत १७ गुन्हे आणि १४३ मिसिंग प्रकरणांतील मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात आला. यामध्ये १०७ तोळे सोने, ७ वाहने, १४३ मोबाईल फोन, लॅपटॉप तसेच अन्य मौल्यवान साहित्याचा समावेश आहे.मुद्देमाल परताव्यात पनवेल शहर पोलीस ठाण्याने १ कोटी ८५ लाख ३४ हजार ५० रुपये, पनवेल तालुका पोलीस ठाण्याने १९ लाख ६ हजार ६५० रुपये, तर खांदेश्वर पोलीस ठाण्याने ३ लाख १७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल संबंधितांच्या स्वाधीन केला.

शनिवारी पनवेल येथील मंथन हॉलमध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त मयुर भुजबळ यांच्या हस्ते संबंधित नागरिकांना त्यांचा मुद्देमाल सुपूर्द करण्यात आला. यावेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.मुद्देमाल मिळविण्यासाठी नागरिकांना विविध कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी एकाच ठिकाणी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्यांना मालमत्ता सुपूर्द करण्यात आली.

त्यामुळे तक्रारदारांची पायपीट वाचली आणि पोलिसांच्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाची प्रक्रिया पूर्ण करून न्यायालयीन बाबींची पूर्तता करत जप्त मुद्देमाल संबंधितांच्या हक्काच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याची ही कारवाई पनवेल पोलिसांच्या कार्यक्षम तपास यंत्रणेचे उदाहरण ठरली आहे.

# महावितरणच्या वरिष्ठ तंत्रज्ञाला लाच घेताना रंगेहाथ अटक

**उरण : रामप्रहर वृत्त**

थकबाकीचे वीजबिल भरल्यानंतरही काढलेले वीजमीटर पुन्हा बसवून देण्यासाठी १८ हजार रुपयांची लाच घेताना महावितरणच्या एका वरिष्ठ तंत्रज्ञाला (वायरमन) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहात पकडले.

बोकडवीरा-उरण येथील महावितरण कार्यालयातील वरिष्ठ तंत्रज्ञ रामेश्वर निवृत्ती घनमोडे असे लाचखोर लोकसेवकाचे नाव असून, त्याच्याविरोधात उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराने व्यवसायासाठी महावितरण कंपनीकडून वीजमीटर घेतले होते. मात्र, वीजबिल न भरल्यामुळे महावितरणने वीजपुरवठा खंडित करून तो मीटर काढून नेला होता. त्यानंतर तक्रारदाराच्या काकी आनंदीबाई ठाकूर यांनी बिल भरणा करून मीटर पुन्हा बसवून घेण्याच्या कामासाठी तक्रारदाराला अधिकारपत्र दिले होते.

तक्रारदाराने थकबाकीचे बिल भरल्यानंतर काढून नेलेले मीटर पुन्हा बसवण्यासाठी वायरमन रामेश्वर घनमोडे याने शासकीय फी व्यतिरिक्त २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. अखेर तडजोडीअंती १८ हजार रुपये देण्याचे ठरले.

या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. प्राप्त तक्रारीची खातरजमा केल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रामेश्वर घनमोडे याला रंगेहात पकडले आहे.

# गव्हाण विद्यालयात सेवकांच्या वतीने प्लंबिंग किट व मार्गदर्शिका संच भेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विद्यालयाच्या प्राचार्याज्योत्स्ना ठाकूर यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या सेवकांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयास शैक्षणिक साहित्य, पुस्तके अथवा विद्यार्थ्यांच्या उपयोगी वस्तू भेट देण्याच्या उपक्रमाला सेवकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



या उपक्रमाचे सातत्य राखत या महिन्यातही विद्यालयातील तीन सेवकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व कौशल्यविकासाला उपयुक्त ठरणारे साहित्य विद्यालयास भेट दिले.विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागातील इंग्रजी विषयाचे तज्ज्ञ प्राध्यापक सोनटक्के सरआणि विद्यालयाच्या उपशिक्षिका सौ. संपदा म्हात्रे यांनीदेखील आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधूनइयत्ता आठवीच्या एन.एम.एम.एस. परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती मार्गदर्शिका व प्रश्नपत्रिका संच विद्यालयास भेट दिला. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी सराव करतायेणार असून त्यांच्या अध्ययनाला निश्चितच अधिक दिशा मिळणार आहे.

त्याचप्रमाणे विद्यालयाच्या गुरुकुल विभागाचे प्रमुख संदीप भोईर यांनी नुकत्याच झालेल्या पालकसभेत विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देण्याचे आवाहन व आश्वासन केले होते. त्यानुसार त्यांनी प्लंबिंग किट विद्यालयास भेट म्हणून दिले. या किटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्लंबिंगसारख्या व्यावहारिक कौशल्यांची प्राथमिक ओळख होऊन 'करून शिकणे' या शिक्षणपद्धतीला चालना मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याधिष्ठित शिक्षणाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या तीनही सेवकांनी आपल्या वाढदिवसाचा आनंद केवळ वैयक्तिक स्वरूपात न साजरा करता तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीशी जोडला. त्यामुळे वाढदिवसानिमित्त भेट देण्याची संकल्पना ही केवळ औपचारिकता न राहता 'विद्यार्थ्यांसाठी काहीतरी देण्याची आणि ज्ञानाचा वारसा पुढे नेण्याची' सकारात्मकसंस्कृती निर्माण करणारी ठरत आहे.साहित्य भेट प्रदान करण्याच्या प्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील तसेच साहित्यदाते प्रा. सोनटक्के, संदीप भोईर व संपदा म्हात्रे आणि विद्यालयातील सर्व सेवकउपस्थित होते.विद्यालयाच्या वतीने प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी तिन्ही सेवकांचे विशेष अभिनंदन करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्यउपलब्ध होत असल्याचे नमूद केले. वाढदिवसानिमित्त ज्ञानोपयोगी साहित्य भेट देण्याच्या या उपक्रमातूनसेवाभाव, सामाजिक बांधिलकी pआणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जाणीव अधिक दृढ होतअसल्याचे त्यांनी सांगितले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या विचाराला अनुसरून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच व्यावहारिक कौशल्ये, स्पर्धा परीक्षेचीतयारी आणि स्व-अध्ययनासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याच्या विद्यालयाच्या प्रयत्नांना याउपक्रमामुळे अधिक बळ मिळत आहे.

# टँकर व दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू; एक जण जखमी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

टँकर आणि दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला तर अन्य एक जखमी झाला. या अपघाताप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ८ सप्टेंबर रोजी टँकरवरील चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

रोहन मुंबईकर (रा. सिद्धी करवले) हा त्याच्या कंपनीतील सहकारी राहुल यादव असे होंडा कंपनीची स्कुटी घेऊन तळोजा खोणी रोड, खोणी दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर आईजीपीएल, नितळस फाटा या ठिकाणी आले. यावेळी टँकर चालकाने टँकर क्रमांक एम एच ०४ बीबी ५६३७ वरील चालकाने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. यावेळी स्कुटीच्या मागे बसलेला राहुल यादव हा खाली पडला आणि रोहन मुंबईकर हे टँकरच्या पुढच्या डाव्या चाकाखाली त्याच्या गाडीसह अटकले.

त्यानंतर टँकर चालकाला गाडी थांबवण्याचा आवाज दिला. मात्र टँकर चालकाने वाहन राहुल यादव यांच्या अंगावरून चालवत नेले. यात राहुल यादव गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला.

# मार्केट यार्ड विद्यालयास उपशिक्षिका व बँक मॅनेजर यांच्याकडून आर्थिक मदत प्राप्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड पनवेल या विद्यालयास विविध सामाजिक संस्था व समाजातील दानशूर व्यक्ती वेळोवेळी मदत करत असतात त्याचप्रमाणे विद्यालयातील शिक्षक व इतर दानशूर व्यक्तींचा देखील मोलाचा हातभार लागत असतो.

विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका प्रतिभा निकम यांनी देखील विद्यालयास रोख रक्कम ५० हजार रुपये स्वखुशीने देणगी दिली आहे. ही रक्कम त्यांनी रयत शिक्षण संस्था साताराचे माजी सचिव व न्यू इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड पनवेल शाखेचे शाखा मित्र प्राचार्य गणेश ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केली.

त्याचप्रमाणे कॅनरा बँकेच्या करंजाडे शाखेच्या शाखा व्यवस्थापक आंचल श्रीवास्तव यांनी ही विद्यालयास ७,०५०/- रुपये देणगी दिली आहे. या रकमेतून विद्यालयाच्या गरीब गरजू विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी भरण्यात येणार आहे.विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.सी. पाटील यांनी या दानशूर व्यक्तींचे आभार मानले.

# सिडकोच्या ११ प्रकल्पग्रस्तांसह १३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोमधील १३ कर्मचाऱ्यांच्या क्षेत्राधिकारी पदावरून त्यांना सहायक विकास अधिकारी पदावर पदोन्नती करण्यात आली. एकाचवेळी १३ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा हा निर्णय ऐतिहासिक मानला जात आहे. त्यामुळे सिडको एम्प्लॉइज युनियनने सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल तसेच सह व्यवस्थापकीय संचालक राजा दयानिधी यांचे आभार मानण्यात येत आहेत.

महामंडळातील क्षेत्र अधिकारी पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सहाय्यक विकास अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली. या निर्णयामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवेला योग्य न्याय मिळून त्यांच्या कार्याला नवी दिशा व प्रेरणा मिळाली असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

ही पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष परिश्रम घेणारे कार्मिक विभागाचे व्यवस्थापक प्रीतमसिंह राजपूत आणि भरती विभागाचे कार्मिक अधिकारी संतोष पळशीकर, तसेच या कार्यात मोलाची साथ देणाऱ्या कार्मिक विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. कर्मचाऱ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेला हा निर्णय निश्चितच त्यांच्या मनोबलात वाढ करणारा आणि अधिक समर्पणाने काम करण्याची प्रेरणा देणारा असल्याचे सिडको कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

जवळपास ३० वर्षांहून अधिक काळ ही पदोन्नती रखडली होती. सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल यांना या प्रश्नाची जाण होती. त्यांनी याबाबत तातडीने कार्यवाही करत कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत न्याय दिला आहे. आम्ही सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल यांचे आभार मानतो. असेसिडको एम्प्लॉइज युनियनचे सरचिटणीस नितीन कांबळे यांनी सांगीतले.

# सिडको एम्प्लॉइज युनियन द्वारसभेत कर्मचाऱ्यांच्या पूर्ण झालेल्या प्रलंबित मागण्यांविषयी दिली माहिती

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको एम्प्लॉइज युनियनच्यावतीने शुक्रवारी द्वार सभा संपन्न झाली. या द्वारसभेत मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.


सदर सभेस युनियनचे सरचिटणीस नितीन कांबळे यांनी कर्मचाऱ्यांना त्यांच्या पूर्ण झालेल्या मागण्या व प्रलंबित असलेल्या पण मंजूर होत असलेल्या मागण्या विषयी सर्वांना माहिती दिली. तसेच कर्मचाऱ्यांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.



त्यानंतर युनियनचे अध्यक्ष सुभाष पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांविषयी युनियन करत असलेल्या प्रयत्नांबद्दल विस्तृत माहिती दिली. तसेच भ्रष्टाचारापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.

सदर सभेस उपाध्यक्ष संजय पाटील, सुधीर कोळी, सहसचिव धर्मराज व्हटकर,सुबोध भोईर,वैभव काळे,धर्मराज भगत,संजीवन पाटील,नितेश पाटील,अमोल दळवी,माधवी शिंदे,हर्षलता पाटील,प्रमिला पाटील,गणेश काकडे,विशाल भगत,विक्रम गायकवाड,आलोक मधाळे युनियन पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहा-अष्टमी नगरपरिषदेची हातगाडी, अतिक्रमणविरोधात धडक मोहीम



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरात ठिकठिकाणी उभे राहत असलेले गाड्या, अधिकृत भाजी व मच्छी मार्केट उपलब्ध असताना ठिकठिकाणी बसत असलेले मच्छी, भाजी विक्रेते व अतिक्रमण विरोधात रोहा अष्टमी नगरपरिषद व रोहा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सकाळी धडक मोहीम हाती घेण्यात आली होती.

रोहा शहर ठिकठिकाणी उभे राहत असलेले फळ विक्रेत्यांच्या गाड्या, ठिकठिकाणी विक्री बसत असलेले मच्छी विक्रेते, भाजीविक्रेते त्यामुळे सातत्याने रोहा शहरात वाहतूक समस्या निर्माण होते. काही ठिकाणी हातगाड्या रस्त्यावर अतिक्रमणित होत्या. त्याचा त्रास नागरिकांना होत होता. अशा तक्रारी नागरिकांना कडून नगरपरिषद येत असल्यानंतर शुक्रवारी सकाळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या नेतृत्वाखाली रोहा शहरात हातगाडी अतिक्रमण या विरोधात धडक मोहीम काढण्यात आली होती. स्वता मुख्याधिकारी अजयकुमार एडके, पोलीस निरीक्षक अभय शेलार यांनी अतिक्रमण हटवण्यात सहभाग घेतला होता.

रोहा शहरातील दमखाडी, नगरपरिषद समोरील चौक, रोहा स्टेशन समोरील परिसर, आशीर्वाद हॉटेलच्या समोरील परिसर यासह शहरातील अन्य परिसरातील हातगाड्या, फळांच्या गाड्या, भाज्यांच्या गाड्या हटवण्यात आल्या. त्यामुळे या शहरातील परिसरातील अतिक्रमण निघाल्याने व गाड्या आठवल्याने परिसर मोकळा झाला आहे. गणेशोत्सवाच्यापूर्वी ही कारवाई झाल्याने गणेश भक्तांना व नागरिकांना शहरात फिरताना वाहतुकीचा त्रास जाणवणार नाही.

# रायगड जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चा उपाध्यक्षपदी प्रकाश घोगरे

**चौक : प्रतिनिधी**


भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रविंददादा चव्हाण, महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर व ओ.बी.सी.मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या सूचने नूसार खालापूर तालुक्यातील हातनोली गावचे प्रकाश घोगरे यांची उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चाच्या उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यांत आली आहे.

रायगड जिल्ह्यात ओबीसी समाजाला एकत्रीत करून भारतीय जनता पार्टीचे संघटन वाढविण्यास आणि मजबूत करण्यास योगदान देतील अशी अपेक्षा रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेश भगत यांनी व्यक्त केली आहे.या नियुक्तीचे पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

यावेळी खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत एका कार्यक्रमात देण्यात आले,पक्षाचाआदेश नुसार आपण उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे,मोतीराम ठोंबरे, मंडळ अध्यक्ष प्रविण मोरे यांच्या नेतृत्वाखाली संघटन वाढविण्यासाठी तळागाळात जाऊन प्रयत्न करू असे उपाध्यक्ष प्रकाश घोगरे यांनी सांगितले. सरपंच रीतु ठोंबरे,प्रदीप गोंधळी,गुड्या देशमुख याचयासह अनेकानी प्रकाश घोगरे यांचे अभिनंदन केले.




# पोलादपूर तालुक्यात बांधणीचे मासे पकडण्यासाठी आदिवासींची लगबग सुरू



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या तीन महिन्यांत मुसळधार पाऊस पडून नाल्यांची पात्र दुथडी भरून नदीकडे वाहू लागली असून याकाळात नदीपात्रालगतच्या चढणीवर नाल्या-शेतात अंडी-पिल्ले सोडण्यास येणाऱ्या माशांची वलगन पोलादपूरकर मासेखाऊंना आदिवासी बांधवांकडून आता चोळईतून सावित्रीत जाण्याआधीच बांधणीचे मासे पकडून विकण्यासाठीही लगबग सुरु झाली आहे. रासायनिक तसेच कोणत्याही प्रकारची कारखानदारी नसलेल्या पोलादपूर तालुक्यातील गोड्या पाण्यातील मासळीची नैसर्गिक चव खवैय्ये मत्स्याहारींकडून विशेष चर्चेत असते.

सध्या पोलादपूर तालुक्यात सावित्री, कामथी, घोडवनी, चोळई आणि ढवळी या पाच प्रमुख नद्यांची पात्रं पाऊस पडल्यानंतर ठिकठिकाणी धरणं आणि बंधारे बांधण्यात आले नसल्याने उथळच दिसत आहेत. मात्र, गेल्या दोन महिन्यांपूर्वी पोलादपूर तालुक्यात पावसाचा जोर वाढल्यामुळे नाल्यांची पात्रं दुथडी भरल्यानंतर नदीकडे येणाऱ्या नाले-ओहोळांतून तसेच शेतीच्या पाण्याच्या पाटातून विरूध्द दिशेने शेताकडे जाऊन उथळ व संथ पाण्यात अंडी अथवा पिले सोडणाऱ्या माशांनी अंडी सोडण्यासाठी उलटा प्रवास करण्याला गावाकडे 'वलगन' असे म्हणतात. या काळात खेडेगावांतील ग्रामस्थ आणि आदिवासी बांधवांनी ही वलगनीची मासळी पकडण्यासाठी पागविणे, बांधणं घालणे, खोचेरे मारणे आणि जाळयात पकडण्याचे विविध मार्ग अवलंबिले आहेत.

आदिवासी बांधवांनी गोड्या पाण्यातील मासे खार्णायांसाठी वेगवेगळ्या नद्या आणि उपनद्यांच्या पात्रातील उथळ पाण्यात फडकं, दगडं अन् लाकडं लावून दोन ते चार फुटी उंचीचे बांध घातले आहेत. या बांधातून पात्रातील पाणी वाहून जात असताना आतापर्यंत आकाराने मोठे झालेले मासे बांधाजवळ जातात आणि लाकडं किंवा फडक्यात अडकतात किंवा उंच झेप घेऊन बांधावरून जाण्याचा प्रयत्न करतात. यावेळी आदिवासी बांधवांकडून हे मासे चलाखीने पकडले जातात आणि विक्रीसाठी नेतात. या माशांना 'बांधणीचे मासे' म्हणून ओळखले जाते.सध्या पोलादपूरच्या लेप्रसी मिशन हॉस्पिटललगतच्या ब्रिटिशकालीन पुलाजवळून देवपूर, कोतवाल, कुडपणकडे जाणाऱ्या रस्त्यावरून नदीपात्रात घातलेल्या बांधाजवळ चोळई नदीतून सावित्री नदीत जाण्याआधीच मोठ-मोठ्या बांधणीच्या माशांची धरपकड करण्यासाठी आदिवासी कुटुंबं ठिय्या देऊन बसल्याचे दिसतात.

# द. ग. तटकरे महाविद्यालयात संदर्भ पुस्तकांच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे दि. 1 ते 10 सप्टेंबर 2026 या कालावधीत विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध विषयांवरील 'संदर्भ पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन' उत्साहात आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित तसेच स्पर्धा परीक्षा, संशोधन व सर्वांगीण ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त संदर्भ साहित्याची माहिती मिळावी, हा या प्रदर्शनामागील प्रमुख उद्देश होता.



माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनातून हा उपक्रम साकारला गेला. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.आर. पांडेय आणि उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांच्या प्रोत्साहन व सहकार्यामुळे या उपक्रमाला यशस्वी स्वरूप प्राप्त झाले. या कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन डॉ. संगिता उतेकर, ग्रंथपाल यांनी केले.

या उपक्रमांतर्गत विविध विभागांसाठी स्वतंत्रपणे संदर्भ पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. दि. 1 सप्टेंबर रोजी मराठी विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्यानंतर दि. 3 सप्टेंबर रोजी इतिहास, भूगोल व इंग्रजी विभागासाठी, दि. 4 सप्टेंबर रोजी माहिती तंत्रज्ञान (IT) विभागासाठी,दि. 7 सप्टेंबर रोजी BMS विभागासाठी, दि. 8 सप्टेंबर रोजी वाणिज्य व BAF विभागासाठी, दि. 9 सप्टेंबर रोजी हिंदी विभागासाठी आणि दि. 10 सप्टेंबर रोजी विज्ञान विभागासाठी संदर्भ पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शनामध्ये संबंधित विषयांतील विविध संदर्भग्रंथ, पाठ्यपुस्तके, स्पर्धा परीक्षा साहित्य, संशोधनपर पुस्तके तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन उपयुक्त ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध पुस्तकांची पाहणी केली व आवश्यक संदर्भ साहित्याची माहिती घेतली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाचा प्रभावी वापर, संदर्भ साहित्याचा अभ्यास, वाचनाची आवड आणि स्व-अध्ययनाची सवय विकसित होण्यास मदत झाली.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

अलिबाग : रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि.११) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १२५ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून १,३६,६००/-रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# माणगावात आता 'नमो उद्यान' ; एक कोटींच्या निधीतून साकारतोय निसर्गरम्य 'ड्रीम प्रोजेक्ट'

**माणगाव : बातमीदार**

माणगांव शहराच्या सौंदर्यात भर घालणारे आणि नागरिकांना गर्दी, वाहतूक कोंडी व वर्दळीपासून काही क्षण निवांत मोकळा श्वास घेता यावा, यासाठी उतेखोल येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या शांत, सुंदर व निसर्गरम्य परिसरात तब्बल एक कोटी रुपये खर्चून 'नमो उद्यान' साकारण्यात येत आहे. या उद्यानाच्या कामाचे भूमिपूजन ऑगस्ट महिन्यात अत्यंत साधेपणाने करण्यात आले असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे.



नगरविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत उत्कृष्ट उद्यान विकसित करण्यासाठी माणगांव नगरपंचायतीला एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

'नमो उद्यान'मध्ये काय असेल?

सुमारे २६.७५ १३.७५ मीटर जागेत साकारण्यात येणाऱ्या या उद्यानात रंगमंच (व्यासपीठ), निसर्गरम्य मंडप (गॅझेबो), विश्रांती शेड, सुगंधी वनस्पतींची बाग, हिरवेगार लॉन, जॉगिंग पाथ, छोटे वाचनालय, खेळाचे मैदान, देशी वृक्षांची लागवड, ओपन एअर जिम, सॅण्डपीट तसेच लहान मुलांसाठी विविध खेळणी आदी सुविधा असणार आहेत. संरक्षक कठडे व आकर्षक प्रवेशद्वारामुळे उद्यानाच्या सौंदर्यात आणखी भर पडणार आहे.

या कामाची निविदा किंमत ९९ लाख ३९ हजार ९९२ रुपये असून नगरपंचायतीने ०.७०० टक्के कमी दराने म्हणजे ९८ लाख ७० हजार ४१२ रुपये इतक्या रकमेस अंतिम मंजुरी दिली आहे. माणगांव नगरपंचायतीच्या स्थायी सभेच्या दि. १३ जुलै २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ३७ नुसार निविदा दरपत्रकास वित्तीय व अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. कामाची मुदत सहा महिने असून ते मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश संबंधित ठेकेदारास देण्यात आले आहेत.

दरम्यान, माणगांव नगरपंचायतीचे प्रभारी स्थापत्य अभियंता आकाश बुवा यांना मंजूर नकाशानुसार स्थळ निर्देशित करून कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करण्याचे, काम मंजुरीनुसार व योग्य गुणवत्तेचे होत आहे याची खातरजमा करण्याचे तसेच कामाच्या प्रगतीचा साप्ताहिक अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

माणगांवकरांना मिळणार निवांत हिरवाईचा विसावा

माणगांव शहरात बाहेरून आलेल्या पाहुण्यांना किंवा नातेवाईकांना फिरण्यासाठी मोजकीच ठिकाणे उपलब्ध आहेत. ग्रामदैवत श्री वाकडाई मंदिर, शंकर मंदिर, काळनदीवरील ब्रिटिशकालीन पूल, काळनदीचा परिसर आणि काही नवी मंदिरे अशी ठिकाणे असली तरी कुटुंबासह काही वेळ शांतपणे बसता यावे, मुलांना खेळता-बागडता यावे आणि मोकळी हवा व झाडांची शीतल सावली अनुभवता यावी, असे स्वतंत्र हिरवाईचे ठिकाण माणगांवमध्ये आजवर प्रकर्षाने जाणवत होते.

ही उणीव 'नमो उद्याना'मुळे भरून निघण्याची अपेक्षा आहे. वृक्षवल्ली, पानाफुलांची हिरवाई आणि निसर्गरम्य वातावरणाने बहरलेले हे उद्यान माणगांवच्या सौंदर्यात निश्चितच भर घालणारे ठरणार आहे.

> ***माणगांव शहरातील नागरिकांना मोकळी, स्वच्छ आणि हिरवाईने नटलेली जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'नमो उद्यान' साकारण्यात येत आहे. उद्यानाचे काम मंजूर आराखडा व गुणवत्तेच्या निकषांनुसार निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. या उद्यानाचा लाभ लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना मिळावा आणि ते माणगांवच्या सौंदर्यात भर घालणारे आकर्षण ठरावे, यासाठी नगरपंचायत प्रयत्नशील आहे.***
>
> ***- संतोष माळी मुख्याधिकारी, नगरपंचायत माणगाव***

'नमो उद्यान' हे केवळ एक गार्डन न राहता माणगांवकरांना कुटुंबासह काही क्षण आनंदात व निवांतपणे घालवता येईल, मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित जागा मिळेल आणि शहराच्या हिरवाईत भर पडेल, असे दर्जेदार उद्यान व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. माणगांवच्या सौंदर्यात भर घालणारा हा प्रकल्प शहराच्या विकासाचा मैलाचा दगड ठरावा, तसेच अशा सकारात्मक आणि पर्यावरणपूरक कामांना लोकप्रतिनिधींचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभावे, हीच माणगांवकरांची अपेक्षा आहे.

# तळा तालुक्यातील गणेश मूर्तीकारांचा रंगकामावर अखेरचा हात

## गणेशभक्त गणेशाच्या आगमनाच्या तयारीला



**तळा : प्रतिनिधी**

गणेश उत्सव चार दिवसावर येऊन ठेपला असून भक्तगण मोठ्या उत्साहात तयारीला लागले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.मूर्तीला मूर्तीकारांचे आता शेवटचा हात मारण्याचे काम सूरू आहे.रंगकाम पुर्णत्वास गेले असले तरी काही गणेश मूर्तीकारांचे ठराविक गणेशमूर्तींच्या डोळ्यांची आखणी व दागिणे रंगविण्याचे काम जोरदार चालू आहे. यावर्षी गणेशमूर्तींच्या कामात महिलांचाही हातभार लागला आहे.

तळा शहरात सहा ठिकाणी गणेशमूर्ती कला केंद्र आहेत तसेच ग्रामीण भागात दोन ठिकाणी गणेशमूर्ती कला केंद्र आहेत.तेथेही गणेशमूर्तीवर शेवटचा रंगाचा हात मारण्याचे काम चालू आहे.यावर्षी रंगाच्या व इतर साहित्याच्या किमती वाढल्याने गणेश मुर्तींच्या ही किंमती वाढल्या आहेत.अनेक गणेश भक्त आता पासूनच गणेशमुर्ती कारखान्यात गणेश मूर्ती नेण्यासाठी येत आहेत.

भक्तगण गेल्या चार पाच दिवसांपासून एक वेगळ्या पध्दतीची आसनव्यवस्था व मखर असावे यादृष्टीने रचना करुन मखरकाम करण्याच्या तयारीला लागले आहेत. बाजारपेठेत किराणा माल,रंग, पूजेसाठी लागणारे साहित्य,खरेदी करण्यासाठी बाजारात येत आहेत.आतापासूनच मोठ्याप्रमाणात बाजारात गणेशोत्सवाच्या दृष्टीने साहित्य दाखल झाले आहे.विद्युत रोषणाईच्या दृष्टीने तोरण,एल ईडी विविध रंगांचे दिवे,फोकस,रंगेबीरंगी कागद, विविध प्रकारचे कापडाचे प्रकार फुले,आदि साहित्या बरोबरच विविध प्रकारची साउन्ड सिस्टीम इत्यादी बाजारात उपलब्ध झाले आहे.

ग्रामिण भागापासून ते शहरापर्यंत घरांचे रंगकामही करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.गणेश आगमन चार दिवसांत आले आहे हे लक्षात घेऊन गावागावातून तयारी होत आहे.तसेच गणेशोत्सवात आता गावागावात चाकरमानी मंडळी येण्यास सुरुवात होते आहे.दोन दिवसांत गावे फुल होऊन गावांमध्ये एक आनंदाचे वातावरण निर्माण होऊन गणेशोत्सव आनंदात साजरा होणार आहे.गणेश मुर्तीकार शिंदे यांच्याशी संवाद साधला असता .ते म्हणाले गणेशमूर्तीचे रंगकाम पुर्ण झाले असून गणेशमूर्ती तयार झाल्या आहेत.

# महिला आशिया कप फायनलमध्ये भारत–श्रीलंका आमनेसामने

## पाकिस्तानचा पत्ता कट

**मुंबई : प्रतिनिधी**

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर महिला आशिया कप २०२६च्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात एक रोमांचक लढत पाहायला मिळाली. गतविजेत्या श्रीलंकेने पाकिस्तानचा चार गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. या विजयामुळे श्रीलंकेने आपले विजेतेपद राखण्याची आशा जिवंत ठेवली असून आता भारत आणि श्रीलंका यांच्यातील आशिया कपचा अंतिम सामना १३ सप्टेंबर रोजी दुबईत होणार आहे.

हा अंतिम सामना मागील आशिया कपच्या अंतिम लढतीइतकाच चुरशीचा होण्याची शक्यता आहे. मागील आवृत्तीत श्रीलंकेने भारताचा पराभव करून पहिल्यांदाच आशिया कपचे विजेतेपद पटकावले होते. त्यामुळे भारतीय महिला संघ त्या पराभवाची परतफेड करण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल. दुसरीकडे श्रीलंकेचा संघ आपले वर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न करेल. भारत–श्रीलंका सामना रविवारी रात्री आठ वाजता सुरू होणार आहे. उपांत्य सामन्यात पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र श्रीलंकेच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच पाकिस्तानी फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. ठराविक अंतराने बळी पडल्यामुळे पाकिस्तानची अवस्था बिकट झाली होती. अशा परिस्थितीत कर्णधार फातिमा सना हिने जबाबदारीने फलंदाजी करत डाव सावरला आणि



नाबाद ४७ धावा केल्या.

तिच्या या कामगिरीमुळे पाकिस्तानला २० षटकांत ५ बाद १३० धावांची मजल मारता आली.१३१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. तरीही हर्षिता समरविक्रमा आणि कविशा दिलहारी यांनी डाव सावरला. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ६९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत श्रीलंकेला सामन्यात परत आणले. त्यांच्या उत्कृष्ट फलंदाजीने श्रीलंकेच्या विजयाचा मार्ग मोकळा केला. मात्र फातिमा सना हिने गोलंदाजीतही चमक दाखवली. तिने श्रीलंकेच्या चार प्रमुख फलंदाजांना बाद करून पाकिस्तानला सामन्यात पुन्हा आणले.

अखेरीस निलाक्षी डी सिल्वा आणि कौशानी नुथ्यांगना यांनी संयमी फलंदाजी करत श्रीलंकेला विजयापर्यंत नेले. श्रीलंकेने आठ चेंडू शिल्लक असताना सहा गडी गमावून १३१ धावांचे लक्ष्य गाठले. परिणामी रविवारी आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारत आणि श्रीलंका यांच्यात एक रोमांचक लढत होणार आहे.

# सीकेटी आंतर–महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा उत्साहात

## जयहिंद महाविद्यालय प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा ४ ते १२ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात आली होती.

या आंतर–महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी केले. त्याचबरोबर मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी, मुंबई शहर झोन–१ स्पर्धा सचिव डॉ. मनोज वर्मा व मुंबई शहर झोन–१ स्पर्धा सहसचिव डॉ. व्ही. बी. नाईक यांची उपस्थिती लाभली. या स्पर्धेमध्ये ५२ महाविद्यालयातील मुलांच्या संघानी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेमध्ये अंतिम फेरीत झालेल्या अटीतटीच्या सामन्यामध्ये जयहिंद महाविद्यालय,




मुंबई संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम विजेतेपद पटकावले, तर महाराष्ट्र महाविद्यालय, मुंबई या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले.

या स्पर्धेमध्ये जि. एन. खालसा महाविद्यालयाने तृतीय स्थान पटकावले, तर के.जे. सोमय्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला चतुर्थ स्थानावर समाधान मानावे लागले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. भरत जितेकर व जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आज भारत–अफगाणिस्तान मुकाबला

## दिल्लीत रंगणार क्रिकेट संग्राम

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी–२० मालिकेला रविवारपासून सुरुवात होणार आहे. मालिकेतील पहिला सामना १३ सप्टेंबर रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. भारतात होणाऱ्या या मालिकेचे यजमानपद अफगाणिस्तानकडे आहे.

टी–२० विश्वचषकानंतर भारतीय संघ प्रथमच अफगाणिस्तानविरुद्ध टी–२० मालिकेत खेळणार असून श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया मैदानात उतरणार आहे.टी–२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताला आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी–२० मालिकांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. मात्र झिम्बाब्वेविरुद्ध भारताने मालिका जिंकली होती. दुसरीकडे अफगाणिस्तानचा संघही टी–२० क्रिकेटमध्ये मजबूत मानला जातो.

टी–२० विश्वचषकानंतर अफगाणिस्तानची ही पहिली टी–२० मालिका आहे. याआधी अफगाणिस्तानने वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका जिंकली होती. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील मालिकेतील पहिला टी–२० सामना रविवार १३ सप्टेंबर रोजी खेळवला जाणार आहे. हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर होणार असून संध्याकाळी सात वाजता सुरू होईल.

# माजी क्रिकेटपटू श्रीसंथच्या वडिलांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताचा माजी क्रिकेटपटू एस. श्रीसंथ याचे वडील व्ही. संथकुमारन नायर यांचे नुकतेच निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. कुटुंबीयाकडून मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी रात्री कोची येथील एका खासगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

संथकुमारन कोचीमधील लिसी रुग्णालयात उपचार घेत होते आणि शुक्रवारी रात्री ९.४५ वाजता त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव सध्या रुग्णालयाच्या शवागारात आहे. परदेशातून नातेवाईक आल्यावर रविवारी त्यांच्या पार्थिवाला कोट्टामंगलम येथील त्यांच्या वडिलोपार्जित घरी नेण्यात येईल आणि तेथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. रविवारी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत संथकुमारन यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येईल. सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येतील.

# गव्हाण विद्यालयाचा पावसाळी क्रीडा स्पर्धेत विजयाचा शुभारंभ

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण–कोपर येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील शासकीय क्रीडा स्पर्धांच्या विजयी वाटचालीचा दिमाखदार शुभारंभ केला आहे. पावसाळी क्रीडा स्पर्धांच्या सुरुवातीलाच झालेल्या कबड्डी स्पर्धेत विद्यालयाच्या १४ वर्षे आणि १७ वर्षे वयोगटातील संघांनी पनवेल तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

गतवर्षी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गव्हाण विद्यालयाच्या खेळाडूंनी यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम राखत मैदानावर दमदार कामगिरी केली. १४ वर्षे वयोगटातील कबड्डी स्पर्धेत गव्हाण विद्यालयाच्या संघाने वावंजे हायस्कूलच्या संघावर मात करत



तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे १७ वर्षे वयोगटातील कबड्डी स्पर्धेत गव्हाण विद्यालयाच्या संघाने रिटघर शाळेच्या संघाचा पराभव करत पनवेल तालुक्यात अव्वल स्थान पटकावले. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी, सांघिक भावना आणि सातत्यपूर्ण सराव यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडू विद्यार्थ्यांचा नियमित सराव सुरू होता.

शारीरिक क्षमता, खेळातील तंत्र, संघभावना आणि आत्मविश्वास यावर विशेष भर देत विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी तयार करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही दररोजच्या सरावाला गांभीर्याने घेत मेहनत घेतल्यामुळेच दोन्ही वयोगटांत विद्यालयाला हे घवघवीत यश संपादन करता आले. क्रीडा क्षेत्रातील या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन अरुणशेठ भगत, ज्युनिअर कॉलेज कमिटीचे चेअरमन वाय. टी. देशमुख तसेच सर्व सन्माननीय सदस्य, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे तसेच सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग यांनी दोन्ही गटांतील विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्राला विद्यालयाकडून प्रोत्साहन दिले जाते.

# विराटचे पुन्हा विजय हजारे ट्रॉफीत खेळण्याचे संकेत

**मुंबई : प्रतिनिधी**

विराट कोहलीने मागील हंगामातील विजय हजारे ट्रॉफीत सहभाग घेतला होता. तब्बल १५ वर्षांनंतर या स्पर्धेत पुनरागमन करताना कोहलीने दमदार फलंदाजी केली होती. आता पुन्हा एकदा विजय हजारे ट्रॉफीत विराट कोहलीचा जलवा पाहायला मिळण्याची शक्यता असून तो दिल्लीकडून या देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धेत खेळताना दिसू शकतो.

दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहन जेटली यांनी विराट कोहली पुन्हा एकदा दिल्लीकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणार असल्याचे संकेत दिले आहेत. बीसीसीआयने आपल्या सर्व खेळाडूंना सामन्याच्या दृष्टीने फिट राहण्यासाठी देशांतर्गत क्रिकेट खेळण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यामुळे विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या मोठ्या खेळाडूंनी मागील हंगामात विजय हजारे ट्रॉफीत सहभाग घेतला होता.



विराटने तब्बल १५ वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफीत पुनरागमन केले आणि दिल्लीकडून दोन सामने खेळले. विजय हजारे ट्रॉफी २०२५–२६ हंगामाला १४ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. विराट या स्पर्धेत खेळणार की नाही याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे.

यावर बोलताना रोहन जेटली यांनी मोठे वक्तव्य केले. विराट कोहली जेव्हा उपलब्ध असेल आणि त्याच्या कामाचा ताण लक्षात घेता खेळणे शक्य असेल तेव्हा तो पुन्हा दिल्लीकडून नक्की खेळेल असे त्यांनी सांगितले. दिल्ली हे विराटचे घरचे क्रिकेट संघटन असून राज्यासाठी खेळण्याची त्याची बांधिलकी शानदार असल्याचेही जेटली यांनी म्हटले.विराट कोहलीने मागील विजय हजारे ट्रॉफीत केवळ दोन सामने खेळले होते. आंध्र प्रदेशविरुद्धच्या पहिल्या सामन्यात त्याने १०१ चेंडूंत १३१ धावांची शानदार खेळी केली होती.

यानंतर गुजरातविरुद्धच्या सामन्यात विराटने ६१ चेंडूंत ७७ धावा केल्या. अशा प्रकारे दोन सामन्यांत त्याच्या नावावर एकूण २०८ धावा होत्या. टी–२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर विराट कोहलीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तुलनेने कमी सामने खेळायला मिळत आहेत. त्याचे प्रमुख लक्ष्य आता २०२७चा वनडे विश्वचषक आहे.

# वॉर्विकशायरकडून खेळताना मानव सुथारची भेदक गोलंदाजी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नुकतेच भारताकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केलेल्या फिरकीपटू मानव सुथारने त्याच्या रेड बॉल क्रिकेटमधील चमकदार कामगिरी सुरूच ठेवली आहे. श्रीलंकेचे मैदान गाजवल्यानंतर तो इंग्लंडमध्ये पोहोचला. तेथे तो काउंटी क्रिकेटमध्ये वॉर्विकशायरकडून खेळत आहे. यादरम्यान त्याने ग्लॅमॉर्गनविरुद्ध अशी काही कामगिरी केली, जी अनेक वर्षांपासून कोणालाही जमलेली नाही.

दुलीप करंडकाच्या अंतिम सामन्यानंतर तीन दिवसांनी तो इंग्लंडला रवाना झाला. त्याने काउंटी चॅम्पियनशिप २०२६ च्या डिव्हिजन १च्या ५८व्या सामन्यात चकित करणारी गोलंदाजी केली. त्याने ग्लॅमॉर्गनविरुद्धच्या त्या



सामन्याच्या दोन्ही डावांमध्ये एकही धाव न देता विकेट घेण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला. कार्डिफच्या सोफिया गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या सामन्यात वॉर्विकशायरने ग्लॅमॉर्गनचा एक डाव आणि २५७ धावांनी पराभव केला. या सामन्यात ग्लॅमॉर्गनने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांचा संघ पहिल्या डावात ६९ धावसंख्येवरच सर्वबाद झाला. यामध्ये मानवने केवळ तीन चेंडू टाकले आणि एकही धाव न देता एक विकेट घेतली.

प्रत्युत्तरात वॉर्विकशायरने आपल्या पहिल्या डावात ३९१ धावा केल्या. तसेच ग्लॅमॉर्गनचा दुसरा डावही ६५ धावांवरच संपुष्टात आला. यामध्ये मानवला दोन षटके टाकण्याची संधी मिळाली. त्याने या दोन्ही षटकांत एकही धाव न देता दोन विकेट घेतल्या. याप्रकारे त्याने या सामन्यात २.३ षटकांत एकही धाव न देता तीन विकेट घेतल्या. ही एक ऐतिहासिक कामगिरी ठरली.एका गोलंदाजाने दोन्ही डावांमध्ये एकही धाव न देता विकेट घेण्याची कामगिरी ही प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्यांदाच झाली आहे.

इंग्लंडच्या टॉम हेवर्डने १८९५ मध्ये अशी कामगिरी केली होती. त्याने ओव्हलवर सरेविरुद्ध लीसेस्टरशायरकडून खेळताना सहा चेंडूंमध्ये ही कामगिरी केली होती. आता १३१ वर्षांनंतर मानवने त्या कामगिरीची पुनरावृत्ती केली आहे. मानवने वॉर्विकशायरकडून आतापर्यंत सात सामने खेळले असून त्यामध्ये २१ विकेट घेतल्या आहेत. त्याचा हा अनुभव आगामी न्यूझीलंड दौऱ्यासाठी उपयोगी पडेल.

# पीएसएलने एकही फलंदाज घडवला नाही

## वसिम अक्रम यांची टीका



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तान सुपर लीग सुरू होऊन दहा वर्षे लोटली, पण या स्पर्धेच्या माध्यमातून पाकिस्तान संघाला एकही फलंदाज मिळालेला नाही. या स्पर्धेने काही गोलंदाज नक्कीच दिले, पण उल्लेखनीय म्हणावा असा फलंदाज या स्पर्धेच्या माध्यमातून समोर आलेला नाही, असे परखड मत महान गोलंदाज आणि पाकिस्तानचे माजी कर्णधार वसिम अक्रम यांनी व्यक्त केले आहे.

जेव्हा आम्ही वैभवसारख्या प्रतिभाशाली खेळाडूंची गुणवत्ता हेरू, त्यांना बहरायला मदत करू, तेव्हाच चांगले क्रिकेटपटू घडू शकतील. टॅलेंट स्काऊटची शिस्तबद्ध यंत्रणा उभी राहायला हवी. देशाच्या कानाकोपऱ्यात खेळणाऱ्या युवा खेळाडूंचा खेळ पाहून आंतरराष्ट्रीय पातळीवर कोण खेळू शकेल, हे समजू शकणारा चमू हवा, असे अक्रम म्हणाले. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने भारतासाठी टी–२० प्रकारात प्रतिनिधित्व केले आहे. आयपीएल स्पर्धेत यंदाच्या हंगामात सर्वाधिक धावा करत ऑरेंज कॅप पटकावली आहे. जगभरातील दर्जेदार गोलंदाजांची तो नियमित धुलाई करत असून त्याला रोखायचे कसे, असा प्रश्न गोलंदाजांना पडत आहे.

कसोटी प्रकारात कामगिरी चांगली व्हावी असे वाटत असेल तर क्लब क्रिकेटचा दर्जा सुधारणे हा एकमेव मार्ग आहे. कराची आणि लाहोर शहरात १०० मिलियन रुपयांची गुंतवणूक पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने करायला हवी. या भागातून अनेक गुणी क्रिकेटपटू पुढे येतात, असे अक्रम यांनी सांगितले.पाकिस्तान क्रिकेटमध्ये अंतर्गत बंडाळ्या मोठ्या प्रमाणावर आहेत. पाकिस्तानचा संघ इंग्लंड दौऱ्यावर असून पाकिस्तानने दोन कसोटी गमावल्या आहेत. दुसऱ्या कसोटीनंतर बोर्डाने अनाकलनीय असा निर्णय घेत सात खेळाडू आणि दोन प्रशिक्षकांना मायदेशी पाठवले.

# धोनींने हिस्सेदारी मागितल्याच्या वृत्ताचे सीएसकेकडून खंडन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीने सीएसकेच्या मालकीमध्ये २५ टक्के हिस्सेदारी मागितल्याचे वृत्त आले होते. त्यानंतर त्याने आपली मागणी कमी करत ती २० टक्क्यांवर आणल्याचेही वृत्त होते, मात्र सीएसकेने त्याला ५.५ टक्के हिस्सेदारी ऑफर केल्याची माहिती समोर आली होती, मात्र याबाबत दोन्ही बाजूंकडून अधिकृतपणे कोणीही बोलत नव्हते.

अखेर सीएसके फ्रँचायझीने यावर मौन सोडले असून त्यांनी महेंद्रसिंह धोनीने आमच्याकडे याबाबतची कोणतीही विचारणा केलेली नाही. आम्ही याबाबत कोणतीही चर्चा केलेली नाही. तसेच धोनी आणि मिस्टर एन. श्रीनिवासन यांच्याशीदेखील चर्चा झाली आहे, याबाबत आम्हाला काही माहिती नाही, अशी माहिती सीएसकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे.

या रिपोर्टमध्ये धोनीकडे फ्रँचायझीचे काही शेअर्स असल्याचे म्हटले आहे. सीएसकेचे शेअर्स हे ओपन मार्केटमध्ये ट्रेडसाठी खुले नाहीत. कंपनी लिस्ट करण्यात आलेली नाही. त्यामुळे ते शेअर्स खासगीरित्या ऑफ मार्केट व्यवहारातून मिळवता येतात. धोनीकडे एक लाखापेक्षा जास्त सीएसकेचे शेअर्स असल्याचे वृत्त आहे.

# एजबस्टन कसोटीत रझाउल्लाचा विक्रमी धमाका

## पदार्पणातच रचला इतिहास

**एजबस्टन : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम येथे ९ सप्टेंबरपासून इंग्लंड विरुद्ध पाकिस्तान मालिकेतील तिसरा आणि अंतिम कसोटी सामना खेळला जात आहे. यामध्ये पाकिस्तानच्या दुसऱ्या डावात वेगवान गोलंदाज रझाउल्ला याने सर्वात जलद अर्धशतक झळकावण्याचा विक्रम आपल्या नावे केला आहे. रझाउल्लाने आपल्या कसोटी पदार्पणाच्या दुसऱ्या डावात सर्वाधिक नऊ षटकार मारले आहेत. कसोटी पदार्पणाच्या एका डावात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम न्यूझीलंडच्या टिम साऊदीच्या नावावर आहे. त्यानेही नऊ षटकार मारले होते.



त्याने ही कामगिरी २००८ मध्ये इंग्लंडविरुद्ध केली होती. आता त्याच्याबरोबरीला रझाउल्ला आला आहे. सर्वाधिक षटकारांबरोबर रझाउल्ला कसोटी पदार्पणात सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा पाकिस्तानी खेळाडूही ठरला. त्याने ४३ चेंडूंतच ५० धावांचा टप्पा गाठला. त्याने ही कामगिरी करताना २०१८ मध्ये आयर्लंडविरुद्ध ५२ चेंडूंमध्ये अर्धशतक केलेल्या फहीम अश्रफला मागे टाकले आहे.

कसोटी पदार्पणाच्या सामन्यात नवव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना अर्धशतक झळकावणारा रझाउल्ला हा पाकिस्तानचा दुसरा फलंदाज ठरला आहे. त्याच्याआधी ही कामगिरी १९८२ मध्ये कराची येथे श्रीलंकेविरुद्ध रशीद खानने ५९ धावा करत केली होती.तसेच पाकिस्तानच्या दुसऱ्या डावात रझाउल्ला ६३ चेंडूंत ४ चौकार आणि ९ षटकारांच्या सहाय्याने ८१ धावा करत बाद झाला.

यामुळे तो पदार्पणाच्या कसोटी सामन्यात नवव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत पाचव्या स्थानावर आला आहे. या यादीत पहिल्या स्थानी बांगलादेशचा अबुल हसन असून त्याने २०१२ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ११३ धावांची खेळी केली होती.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com